औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १७/०६/२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक१७.६.२००५ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारणा सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे दुपारी ५.२५ वाजता 'वंदेमातरम् ' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.श्री.घडमोडे भगवान देविदासराव
०२. स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
०३. स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
०४. स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
०५. स.श्री. बमणे पूनमचंद सोनाजी
०६. स.श्री. सुरे सिताराम इसराम
०७. स.श्री. ताठे भाऊसाहेब पुडंलिक
०८. स.श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०९. स.श्री. पांडे विनायक प्रभाकर
१०. स.श्री. दाभाडे मिलींद यशवंत
११. स. श्री. ठाकूर पुरूषोत्तम रघुवीरसिंग
१२. स.श्री. खान सलीम खान यासीन
१३. स.श्रीमती पाटील अलका रमेश
१४. स.श्री. जगताप संजय उत्तमराव
१५. स.सौ. मसरत बेगम शरफोद्दीन
१६. स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१७. स.सौ. जोशी रजनी रमेश
१८. स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.श्री. अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.श्री. जैस्वाल अनिल जुगलाल
२१. स.श्री.सोनवणे कचरू श्रीपत
२२. स.सौ.रगडे सुशिला भगवान
२३. स. श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.सौ. पाटील दिपाली सुनिल
२५. स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२६. स.सौ. खान अजरा जबीन मसुद खान
२७. स.सौ. खान मेहेरउन्नीसा खान हमीद
२८. स.श्री.मोहमंद जावेद मोहमंद इसाक
२९. स.सौ.मिटकर शोभा हरिशचद्र
३०. स.श्री.यास्मीन बेगम अ.कदिर
३१. स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन

३२. स.श्री.सय्यद खुसरो बुऱ्हानोद्दीन
३३. स.श्री. अब्दुल रशिद खान मामू हमीदखान
३४. स.सौ.दलाल लता श्रीनिवास
३५. स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
३६. स.श्री.रिडलॉन संजू सुग्रीव
३७. स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३८. स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३९. स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४०. स.श्री. खान निसार मोहमंद खान
४१. स.श्री.शेख मुनाफ शेख यासीन
४२. स.श्री.हाजी शेरखान अब्दल रहेमान
४३. स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४४. स.सौ.राऊत छाया विलास
४५. स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४६. स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.श्री.अमोदी अबुबकर बिनसईद
४९. स.श्री.शेख शमशाद बेगम शेख हफिज
५०. स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५१. स.श्री .पटेल सलीम शमशेर पटेल
५२. स.श्री.मोतीवाला अश्रफ म.युनूस
५३. स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
५४. स.सौ.पोळ सरला सखाराम
५५. स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५६. स.सौ.खान जहुराबी नासेर
५७. स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५८. स.श्री.कराड भागवत किसनराव
५९. स.सौ.गायकवाड मंगला प्रकाश
६०. स.श्री.वैद्य रेणूकादास दत्तोपंत
६१. स.सौ.महाजन मनिषा अमर
६२. स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६३. स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६४. स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
६५. स.श्री.खुडे विजय किसनराव
६६. स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६७. स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६८. स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६९. स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
७०. स.सौ.ससाणे सरिता अशोक
७१. स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबूराव
७२. स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७३. स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद

७४. स.सौ.शिंदे पुष्पा बाळू
७५. स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७६. स.सौ.जाधव संगीता विठ्ठलराव
७७. स.श्री.विसपुते शशांक दामोधर
७८. स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७९. स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
८०. स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
८१. स.श्री.जोशी संजय रामदास
८२. स.सौ.रहाटकर विजया किशोर
८३. स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८४. स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८५. स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८६. स.सौ.जैन अल्पा विकास
८७. स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८८. स.सौ.मोमीन सफिया फिरदोस
८९. स.श्री.जहागिरदार अजिज मुख्तार अहेमद
९०. स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

नामनिर्देशित पालिका सदस्य

०१. स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.श्री.राजेश गुलाबचंद व्यास
०४. स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

संवाद :

श्री.मुजीब खॉन : शहरात पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी वेळ देण्यात यावा.

मा.महापौर : पाणी प्रश्नावर जास्त वेळ चर्चा करावी लागणार आहे.दिवसभर चर्चा करावी लागणार आहे.त्यासाठी एक विशेष बैठक आयोजीत करण्यात येईल

श्री.मुजीब खान : अनेक भागात पाणी पूरवठा होत नाही.मुजीब कॉलनी ,किराडपूरा तसेच मकसूद कॉलनी भागात पाणी येत नाही. मुजीब कॉलनी भागात १५दिवसापासून पाणी नाही. तेथील जनता हैराण झालेली आहे. यापूर्वीही आपण विशेष बैठक आयोजन करण्याबाबत रूलींग दिलेले होते. परंतु सभा आयोजीत केलेली नाही. एक महिना झाला.पाणी दिले नाही तर वार्डातील जनता आम्हाला मारण्यासाठी उठेल.

मा.महापौर : संपूर्ण शाहराचाच पाण्याच्या बाबतीत प्रश्न आहे एकाच भागातील नाही.सविस्तर अशी चर्चा करावी लागणार आहे.१०-१५ दिवसात पाणी प्रश्नावर बैठक आयोजीत करण्यात येईल.

श्री.मनमोहनसीग ओबेरॉय:१५ दिवस जास्त होतात. ८ दिवसात सभा बोलवावी.अशी विनंती आहे.

श्री.अजीज जागीरदार : आजची सभा ही उशीरा आयोजीत केलेली असून किमान ५ ते ६ तास म्हणजेच सुमारे १०.०० वाजेपर्यंत सभा चालेल. येथे जे कर्मचारी काम करतात त्यांना जास्तीच्या कामाचा मोबदला देणार आहात काय ?ऑफीसच्या वेळेनंतर सभांचे कामकाज चालणार आहे. हे बरोबर आहे का ?

मा.महापौर : शहरातील नागरीक विविध प्रकारच्याकामासाठी या महानगरपालिकेत येतात. त्यांना अधिकारी,कर्मचारी यांचा संपर्क होत नाही. त्यांना तसेच परत जावे लागते, म्हणून त्यांचे समस्या सोडविल्या जातील, कामे वेळेवर होतील. या दृष्टीकोनातुन उशीरा सभा आयोजीत केलेली आहे. कर्मचाऱ्यांना जास्तीच्या कामाचा मोबदला द्यायचा किंवा काय ही प्रशासकीय बाब आहे. त्यावर चर्चा करणे बरोबर नाही.

श्री.दिलीप गायकवाड : महापालिकेच्या तिजोरीत किती रक्कम शिल्लक आहेत याची लेखी स्वरूपात माहिती देण्यात यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : वृत्तपत्रातून आपण काही विकास कामाबाबतच्या घोषणा केलेल्या आहेत .त्या बाबतीत आतापर्यंत काय कार्यवाही झालेली आहे माहिती देण्यात यावी.

मा.महापौर : ज्या बाबतीत मी घोषणा केलेली आहे ती सर्व कामे करण्याचे प्रयत्न आपल्या सहकार्याने होईल.आपणा सर्वांचे सहकार्य असावे. महापालिकेच्या हिताचे निर्णय घेता येतील. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

विषय क्र. १९/१ :

दिनांक १९.५.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सौ.संगिता जाधव : मी मागील बैठकीत हनुमाननगर,गजाननननगर,पूडंलिकनगर भागातील पाण्याचा प्रश्न मांडलेला होता .माझ्या संवादाच्या संदर्भात सौ.रगडे यांचे नाव टंकलिखित झालेले आहे. ते दुरूस्त करण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: पान क्र २४ वर ठरावात काही रस्त्याचा समावेश केलेला आहे. यात पीरबाजार ते शाहनूरमिया दर्गा या रस्त्याचा समावेश करण्यात यावा.

श्री.अब्दुल रशीद खॉन :याच प्रस्तावात पानचक्की ते जूब्लीपार्क डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयापर्यंत रस्त्याचा समावेश करण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : वैयक्तीक असे रस्ते न घेता एक आराखडा तयार करण्यात यावा.आवश्यक त्या त्या भागातील महत्वाचे रस्ते यात समावेश करावेत.

श्री.अजीज जगागीरदार :रेल्वेस्टेशनकडून येणारा तसेच चिकलठाणा कडून येणा-या रस्त्याचा यात समावेश करण्यात यावा. मागिल बैठकीत मी बोललो होतो.पर्यटक त्या मार्गाने येतात.

मा.महापौर :हा मागील वेळेस अशासकीय प्रस्ताव होता. प्रशासनाचा नव्हता. जे जे रस्ते स.सदस्यांनी सुचविलेले होते त्याचा समावेश करण्यात येईल.त्यास सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.या बाबतीत प्रशासन तांत्रिक बाब तपासून पाहिल.व जे रस्ते करणे आवशक आहे त्या बाबतीत लवकरच प्रस्ताव प्रशासनामार्फत या सभागृहासमोर येईल.दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

श्री.अजीज जागिरदार :पान क्र १९ वर मी ज्या रस्त्याच्या बाबतीत बोललो होतो ते रस्ते घेण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: मा.आयुक्त नवीन आलेले आहे स.सदस्य सुध्दा नवीनच आहेत. स.सदस्यांचा परीचय आयुक्तांना करून दयावा नसता मा.आयुक्तांचा परीचय सदस्यांना करून दयावा. जेणे करून स.सदस्यांना अडचण येणार नाही.

ठराव :

दिनांक १९.५.२००५ च्या इतिवृत्तांतात संवादामध्ये सौ.रगडे यांचे ऐवजी सौ.संगिता जाधव हे नांव दुरूस्त करणे व इतर दुरूस्त्यासह इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

विषय क्र. २०/२ :

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उस्मानपुरा येथील बचत भवनासाठी (संत एकनाथ रंग मंदिरासाठी) वाहनतळाची आवश्यकता लक्षात घेता

उक्त इमारतीच्या पूर्वेकडील दोन खुले भूखंड (१) न.भू.क्र.१४४८८/१, क्षेत्रफळ ५३०.६० चौ.मी. आणि (२) न.भू.क्र.१४४९३/१,क्षेत्रफळ ५५७.४० चौ.मी. अशा प्रकारे दोन्ही भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ ५३०.६०+५५७.४० = १०८८.०० चौ.मी.क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे.

यापुर्वी दिनांक २०.०४.१९८७ रोजी उक्त भूखंडाचे उक्त एकूण १०८८.०० चौ.मी. क्षेत्रासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आला होता. वरील भूसंपादनाची कार्यवाही प्रगती पथावर असतांना उक्त भूखंडाच्या मालकांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून भूसंपादनाच्या कार्यवाहीस स्थगिती मिळविली होती. मा.उच्च न्यायालयाने सदरील प्रकरणाच्या याचिका दिनांक ११.०४.२००० रोजी फेटाळुन लावून भूसंपादनाच्या कार्यवाही वरील स्थगिती उठविली.

मा.विभागीय आयुक्त, यांनी विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक,औरंगाबाद यांना कळविले आहे की, मा.उच्च न्यायालयापूढे प्रकरण प्रलंबित असलेला काळ वगळला तरी अंतिम निवाडा कायद्यात घालून दिलेल्या मुदतीत होऊ शकला नसल्यामूळे वरील भूखंडाच्या भूसंपादनाची कार्यवाही व्यपगत झालेली आहे.

करीता उक्त जागेचे भूसंपादन करण्यास्तव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे नवीन प्रस्ताव पाठवावा लागेल.

संत एकनाथ रंग मंदिरासाठी वाहनतळ क्षेत्र ९११ चौ.मी. आवश्यक आहे. करीता उक्त दोन्ही भूखंडाचे सार्वजनिक कारणासाठी भूसंपादन करणे जरूरीचे आहे.

वरील भूखंडापैकी न.भू.क्र.१४४९३/१ च्या मालकाने त्यांची मिळकत नियमीत वेळेत ताब्यात घेणे बाबत किंवा मिळकत धारकास सदरील भूखंडाचा विकास करू देणे बाबत महानगरपालिका औरंगाबाद व शासनास निर्देश देणे बाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका स्टँप क्रमांक २६६२/२००५ (याचिका क्र.१२३२/२००५) दाखल केलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने भूसंपादन करणे संबंधि चार महिन्याची मुदत दिलेली आहे.

करीता उक्त दोन्ही भूखंड न.भू.क्र.१४४८८/१ व १४४९३/१ यांचे एकूण क्षेत्र १०८८.०० चौ.मी. क्षेत्र संपादन करण्यासाठी भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचककडे पाठविण्यासाठी मान्यतेस्तव व विचारास्तव सादर.

<u>संवाद :</u>

श्री.मनमोहनसींग ओबेरॉय:प्रस्तावात जागा भू-संपादन करीत आहोत असे दिले. सदरील जागा मनपाच्याच मालकीची आहे अशी माझी माहिती आहे. याबाबत संपुर्ण चाकशी होणे आवश्यक आहे. उस्मानपूरा येथील ओपन स्पेसच्या जागेवर घरे झाली ती जागा उद्यानसाठी आरक्षीत होती.त्यासाठी यापूर्वीही मी म्हटले होते ज्याची जागा आहे तो मालक कोण आहे त्या जागेचे नकाशे सभागृहात ठेवावयास पाहीजे. स.सदस्यांना सर्व माहिती मिळेल असा प्रस्ताव समोर यावयास पाहिजे.रिझर्वेशन झोन मध्ये जागा येत असेल तर ७० टक्के संबंधीत मालकास व ३० टक्के महापालिकेस मिळेल विकसीत करावी. महापालिकेला पैसे मोजावे लागणार नाही.आता ही जमीन घेतली तर महापालिकेस पैसे मोजावे लागेल. नाही पैसे दिले तर जमिन जाईल कारण करोडे रूपये देण्याइतकी मनपाची आर्थीक परीस्थिाती नाही. यावर प्रशासनाचे मत विचारात घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : भूसंपादनासाठी प्रस्ताव समोर आलेला आहे. मुळातच मनपास संत एकनाथ रंग मदीरापासून फारसे उत्पन्न नाही. संत एकनाथ रंग मंदीराच्या आतील भागात जवळपास ४०० चौ.मी. एव्हढी जागा असतांना सुध्दा आपण १.०० कोटी रूपये खर्च करून जागा भूसंपादन करणे कितपत योग्य आहे.दुसरा मुद्या असा की संत एकनाथ रंग मंदीराच्या उत्तरेकडील जो भाग आहे तो अतिक्रमीत आहे.ते त्वरील

हटवून रंग मंदीराची भिंत तिथपर्यंत घेतल्यास अधिक पार्कीगंसाठी जागा उपलब्ध होईल .महापालिकेचा पैसा चांगल्या कामासाठी खर्च करावा ही जागा भूसंपादीत करु नये.

श्री.देसरडा प्रशांत :पार्कीगंसाठी जागा आवश्यक आहे असे प्रशासनाचे मत आहे. तसा प्रस्तावसमोर आलेला आहे. जेंव्हा संत एकनाथ रंग मंदीर झाले तेंव्हा पार्कीगचा विचार का केला गेला नाही असा प्रश्न समोर येतो.खरोखरच पार्कीगंची आवशकता होती तर दिंनांक ३०.४.१९८७ पासून हे प्रकरण चालू आहे.भूसंपादनासाठी लागणारा खर्च हा आताच्या रेडीरेकनर रेट प्रमाणे असेल. रेडीरेकनरचा दर कोणता आकारण्यात आलेला आहे हे प्रस्तावात नाही. त्याचा खुलासा होणे आवशक आहे.१९८७ च्या रेडीरेकनर प्रमाणे हा प्रस्ताव यावयास पाहिजे. दुसरे असे की,पार्कीगसाठी आरक्षण असेल तर त्याचे व्यापारी संकूल करून ७५/२५ प्रमाणे जसे प्रपोजल करतो. यावर रिझर्वेशन असेल तर त्यांना इमारतीसाठी परवानगी दयावी व पार्कीगंसाठी जागा जसे ७५/२५ प्रमाणे बीओटी पध्दतीने करतो त्याप्रमाणे कार्यवाही करावी तसे प्रपोजल देण्यास हरकत नसावी.तसा प्रस्ताव संबंधीत मालकाकडून कदाचित आला सूध्दा असावा असे माझे मत आहे. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा तसेच रेडीरेकनरचे दर कोणते आकारण्यात आलेले आहे.

श्री.अब्दुल रशीद खॉन :जेंव्हा संत एकनाथ रंग मंदीर झाले तेव्हा पार्कीगसाठी जागा ठेवण्यात आलेली नाही यात चूक कोणाची आहे प्रशासनाची की अधिका-यांची याचा खुलासा करावा तसेच जी जागा ठेवली होती त्यावर काहींनी अतिक्रमण केले त्यांना हठविण्यात आले का ? का कार्यवाही केलेली नाही.आता जमिन घेणार परत ती अतिक्रमण केलेली जागा त्या लोकांकडेच राहील. बाजूची जागा सरकारी असू शकते हे सुध्दा तपासावे लागेल.माझ्या माहिती प्रमाणे या जागेबध्दल काही तरी गडबड आहे.अर्ध्या जागेला परवानगी देणार अर्धी जागा पार्कीगसाठी ठेवणार हे सर्व प्रशासनास बघावे लागेल.मनपाच्या जागेवर कोणी बांधकाम करीत असेल तर महापालिकेने सुध्दा नियम बघीतले पाहिजे. गेटच्या बाहेर एक रूम अनधिकृत रित्या तयार केलेली आहे. महापालिकाच स्वत: अनधिकृत बांधकाम करीत आहे हे सुध्दा बघीतले पाहिजे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: किती रक्कम दयावी लागणार आहे याचा प्रस्तावात उल्लेख नाही.विषय क्र. २ मध्येही दिलेले नाही.

मा.महापौर : त्याचा खुलासा केला जाईल.

श्री.कोकाटे काशिनाथ : एकाच प्रस्तावात दोन भूखंडाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.प्रस्तावाच्या संदर्भात सर्व परीस्थिती बाबत माहिती ठेवणे आवशक आहे.रिझर्वेशन ठेवलेले आहे का ?भूसंपादनाची कार्यवाही करावी लागणार आहे. या प्रस्तावाबाबत प्रशासनाच्या वतीने अगोदर सविस्तर खुलासा करण्यात यावा त्यानंतरच सविस्तर चर्चा या विषयावर करता येईल.या शहरातील जागा भूसंपादनासाठी जवळपास एक हजार कोटी रू. खर्च लागणार आहे. त्यासाठी निश्चितपणे एक समिती स्थापन करावी लागेल.पुन्हा शहराचा सर्वे करून आवश्यक त्या जागांची पाहणी करावी लागणार आहे. हा प्रस्ताव प्रशासनाचा असल्यामूळे प्रशासनाचे याबाबत काय मत आहे खुलासा घ्यावा.

मा.महापौर : सहा.संचालक नगररचना यांनी सविस्तर खुलासा करावा.

सहा.संचालक (न.र.) : हा प्रस्ताव संत एकनाथ रंग मंदीर साठी पार्कीगची जागा भूसंपादन करण्याचा आहे. स.सदस्यांचा एक प्रश्न होता की, या पूर्वीच जागा पार्कीगसाठी का ठेवण्यात

आलेली नव्हती. परंतु जेंव्हा ही इमारत बांधकाम झाले तेंव्हा बचतभवन म्हणून बांधकाम झालेले होते. त्यामूळे पार्कींगसाठी जागा ठेवलेली नव्हती. जेंव्हा संत एकनाथ मंदीर झाले तेव्हा पार्कींगची आवशकता भासली म्हणून हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

श्री.संजय जोशी :बचतभवनासाठी आरक्षण होते तर का करण्यात आलेले नाही संत एकनाथ रंग मंदीरासाठी का इमारत देण्यात आली. बचतभवनासाठीच ठेवावयास पाहीजे होती प्रस्तावात संत एकनाथ रंग मंदीर (बचतभवन) असे दिलेले आहे.मला हा प्रस्तावाच कळालेला नाही अगोदर बचतभवन होते का नंतर आरक्षण बदलून संत एकनाथ रंग मंदीर झालेले आहे? प्रस्तावात का नमूद केलेले आहे सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :विषय क्र २ च्या बाबतीतच खुलासा करावा

सहा.संचालक(न.स.) : १९८७ ला जो मूळात प्रस्ताव होता तो बचतभवन/नाटयगृह असा होता. त्यानूसार तसे नमूद करण्यात आलेले आहे तसेच या जागेवर ७५-२५ प्रमाणे विकास करता येणार नाही का असा प्रश्न विचारलेला आहे मुळात हे दोनही प्लॉट निवासी झोनमधे आहेत ले-आऊट मधील प्लॉट आहे ते भुसंपादनच करावे लागतील.

श्री.भागवत कराड : संतएकनाथ रंग मदीरात ९५० ते १००० नागरीक बसू शकतात पार्कींगसाठी समोरची जी जागा आहे ती योग्य आहे की नाही यावर प्रशासनाचे मत घ्यावे.

सहा.संचालक (न.र.) : ती जागा योग्य नाही म्हणून ही जागा भूसंपादीत करायची आहे.

श्री.प्रशांत देसरडा : संबधीत मालकाकडून काही प्रस्ताव वगैरे आलेला आहे का पार्कींगची व्यवस्था करून देणार व इतर जागेवर ते विकास करणार. ही जागा भूसंपादन करावयाची झाल्यास कोणता रेडीरेकनरचा दर लावण्यात येणार आहे.

सहा.संचालक(न.र.) : बांधकाम परवानगीचा त्या मालकांचा प्रस्ताव दाखल झालेला होता याबाबत सर्वसाधारण सभेत निर्णय होणे अपेक्षीत होते म्हणून प्रस्ताव ठेवलेला आहे ७५-२५ प्रमाणे विकास करण्याबाबतचा त्या मालकाचा प्रस्ताव नव्हता.भुसंपादनासाठी सध्याचा जो चालू रेडीरेकनरचा दर आहे त्याप्रमाणे लागेल.

श्री.देसरडा प्रशांत : १९८७ च्या रेडीरेकनर प्रमाणे सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे त्यानुसार कोर्यवाही होणे योग्य होईल.संबधीत व्यक्ती न्यायालयात गेलेले होते महानगरपालिका स्वत:हून गेलेले नव्हते.

सहा.संचालक(न.र.) : तो प्रस्ताव लॅप्स झालेला आहे हा नवीन प्रस्ताव आहे.संबधीत व्यक्ती न्यायालयात गेलेली होती परंतु भूसंपादनाचा प्रस्ताव लॅप्स झालेला आहे म्हणून चालू दराने रक्कम दयावी लागेल.

श्री.देसरडा प्रशांत : लॅप्स बद्दल अपील वगैरे केलेले नव्हते का.

मा.महापौर : न्यायालयातील परीस्थिती काय आहे खुलासा करावा.

सहा.संचालक(न.र.) : न्यायालयाने या संबधी चार महिण्याची मुदत निर्णय घेण्यासाठी दिलेली आहे १७ जूलै रोजी मूदत संपत आहे.

श्री.वैद्य रेणुकादास : रंग मंदिराच्या आसपास जागा असतांना हे दोन्ही प्लॉट घेण्याची आवश्यकता आहे का? पार्कींगसाठी एकूण किती जागा आवश्यक आहे, खुलासा करावा.

सहा.संचालक नगर रचना : संत एकनाथ रंग मंदिरात एकूण ९४० आसन संख्या आहे. कार,मोटार सायकल व सायकल पार्कींगसाठी ९११ चौ.मी. जागा आवश्यक आहे.

श्री.शिरसाट संजय : सद्या जागा आहे किती व किती जागा पाहीजे.

सौ.दलाल लता : संत एकनाथ रंग मंदिराच्या परीसरात किती जागा उपलब्ध आहे. आणखी किती जास्तीची जागा भूसंपादीत करण्याची आवश्यकता आहे, खुलासा करावा.

सहा.संचालक नगर रचना : २६९ चौ.मी. जागा उपलब्ध आहे. ९११ चौ.मी. जागा आवश्यक आहे.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : या जागेसाठी ५५ लक्ष रूपये आवश्यक आहे, ही जागा घेतल्यानंतर खालच्या साईडला पार्कींग व वरती शॉपींग सेंटर होऊ शकते. त्यासाठी ही जागा भूसंपादीत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

मा.महापौर : पार्कींग करून तेथे कमर्शियल करता येते का? खुलासा करण्यात यावा.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : पार्कींगसाठी आरक्षित नाही, निवासी वापरासाठीची जागा आहे. पार्कींग करून वरच्या मजल्यावर कमर्शियल करू शकतो. अशी माझी सूचना आहे.

उपमहापौर : या प्रस्तावावर चर्चा होत असतांना किती रक्कम लागणार आहे, असा प्रश्नही उपस्थित झाला. शिवाय महापालिकेकडे एवढे बजेट आहे का? खालच्या साईडला पार्कींग,वरती दुकाने. पार्कींगसाठी आरक्षित केल्यानंतर कमर्शियल बांधकाम करता येते का? हा सुध्दा खुलासा अपेक्षित आहे. ठराव वेगळ्या पध्दतीने मंजूर करणार त्याचा उपयोग वेगळा होणार यात महानगरपालिकेची बदनामी होईल. स्पष्ट असा खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. : मुळात ही जागा निवासी झोन म्हणून आहे. भूसंपादन झाल्यास चालू रेडीरेकनर प्रमाणे रक्कम देणार आहोत. पार्कींगसाठी घेत असलो तरी वरती बांधकाम करणे शक्य होईल.

श्री.ठाकुर पुरूषोत्तम : संत एकनाथ रंग मंदिर हे शहराची शान आहे. ९४० ते १००० प्रेक्षक तेथे बसू शकतात. तेथे पार्कींग सुविधा उपलब्ध नाही. परंतू १.०० कोटी रूपयाची जागा घेण्या सारखी महापालिकेची आर्थिक परिस्थिती नाही. माझी सूचना अशी की, पार्कींगच्या व्यतिरिक्त तेथे व्यापारी संकुल व्हावे. जेणे करून महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२८ अंतर्गत असे करता येते असे माझे मत आहे. यावर सविस्तर खुलासा करण्यात यावा.

श्री.बारवाल गजानन : पार्कींगची आवश्यकता आहे. दोन प्लॉट आहे. या संत एकनाथ रंग मंदिरात व्ही.आय.पी.प्रोग्राम होतात,समोरचा प्लॉट अतिशय महत्वाचा आहे तो भूसंपादन करावा. मागचा प्लॉट डिलीट करावा. मोठ्या पार्कींगची आवश्यकताच नाही. आताच खुलासा केलेला आहे.

श्री.कराड भागवत : पार्कींगसाठी नागरीकांना त्रास होतो. हे बरोबर आहे. दोन प्लॉटपैकी एक समोरचा प्लॉट घेण्यात यावा. दूसरा मागच्या प्लॉटसाठी पैसे नसतील तर घेऊ नये. संत एकनाथ रंग मंदिर परीसरात काही जागा उपलब्ध होऊ शकते. ही जागा पुरेपूर होईल.

श्री.अ.रशिद खॉन (मामु): दोन्ही प्लॉट खरेदी करावे, एकास डिलीट करू नये. तसे केल्यास एकतर्फी निर्णय घेतला असा समज होईल.

मा.महापौर : आपण ज्येष्ठ सदस्य आहात असे बोलणे योग्य नाही. सभागृहात चर्चा होत आहे. एकाच प्लॉटची आवश्यकता असेल तर महापालिकेचा फायदा होईल, तसा खुलासाही झालेला आहे.

श्री.अ.रशिद खॉन (मामु): ठराव दोन प्लॉट घेण्याबाबत असून दोन्ही प्लॉट खरेदी करावे. एक घेणार, एक सोडणार असाल तर बरोबर नाही.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : हा विषय स्थगित ठेऊन संपूर्ण माहितीसह पूढील बैठकीत ठेवावा.

मा.महापौर : न्यायालयाचे आदेश आहे, आजच्या बैठकीतच निर्णय घ्यावा लागेल.

श्री.देसरडा प्रशांत : २ मुद्दे आहेत. एक प्लॉट डिलीट करायचे का? या प्लॉटवर संबंधीत मालकास वाणिज्य वापराकरीता परवानगी देऊन खालच्या मजल्यावर पार्किंगची व्यवस्था करून विनामुल्य देण्यास तयार असेल तर तशी कार्यवाही करावी. यात महापालिकेचा फायदा आहे.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : आज निर्णय घेतला नाही तर जाणून बुजून कार्यवाही होत नाही असा अर्थ होईल. ५५ लक्ष देऊन भूसंपादन करण्यास हरकत नाही. भूसंपादनाचे दर कमी आहे. कमीत कमी १ कोटीची जागा आहे. संपूर्ण शहराचे लक्ष महापालिकेकडे असते. जागा भूसंपादीत करणे गरजेचे आहे. मतदान घ्यावे.

श्री.संजय केनेकर : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा केला,परंतू सदस्यांना समजलेला नाही. एक प्लॉट हा पार्किंगसाठी कमी पडतो. बऱ्याचवेळा रस्त्यावर अपघात झालेले आहे. त्यासाठी दोन्ही प्लॉट भूसंपादीत करावे.

श्री.शिरसाट संजय : ८ दिवसापूर्वी ही जागा भूसंपादीत होणार की, नाही वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली. त्याचवेळेस ईटखेडा येथीलही एका जागेच्या संदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती. हा प्लॉट कूणाच्या मालकीचा आहे हे सभागृहाला याची कल्पना नाही. नविन आयुक्त आलेले आहे. त्यांचे सभागृह नेता या नात्याने मी स्वागत करतो. संबंधीत मूळ मालक यांनी बांधकाम परवानगी मागणी केलेली होती. संबंधीत विभागाने त्यांना पत्र दिले की, ही जागा महापालिकेस संपादीत करण्याचा विचार आहे. त्या जागेवर कोणतेही आरक्षण नाही हे मान्य केलेले आहे. १८ वर्ष त्या मालकांनी वाट बघीतली जागा संपादीत करायची असेल तर तशी कार्यवाही होईल. नामंजूर केले तर शासनाकडे ती व्यक्ती अपील करू शकते. त्या जागेवर आरक्षण नाही, त्यावर चर्चा होत आहे. नाट्यगृह बांधतांना बचतभवन होते. नाट्यगृहात रूपांतर केले. पार्किंगसाठी जागा आवश्यक आहे. परंतू संत एकनाथ रंग मंदिराच्या आतील काही जागेवर अतिक्रमण झालेले आहे. मूळ जागा कमी झाली आणि ज्यांनी ले-आऊट मधला प्लॉट घेतला, बांधकाम परवानगी देत नाही म्हणून त्या व्यक्तीस न्यायालयात जावे लागले. त्यांनी कोर्टात नमूद केले की, माझी जागा रिझर्वेशनमध्ये नाही. बांधकाम परवानगी द्यावी. भूसंपादीत करायची असेल तर पैसे द्यावे अशी मागणी केली. कोणतीही बाजू ऐकून घेतली नाही. आरक्षण बदल करता येत नाही आताच खुलासा केला. मा.न्यायालयाचा २ महिन्यापूर्वी एक निर्णय आलेला आहे. स.स.श्री.संजय जोशी यांचे वार्डात एक शाळा होती, ती जागा उद्यानासाठी आरक्षित होती. ती शाळा ताब्यात घेण्याचे आदेश दिले व तेथे उद्यानच झाले पाहीजे. याचा अर्थ परपजमध्ये बदल करता येत नाही. कार्यरत असलेले शॉपींग कॉम्प्लेक्स भाडे तत्वावर गेले नाही. जय टॉवर्स मधील २७ शॉपस आहे. ५ वर्षापासून मागणी करतो आजही भाडे तत्वावर दिले नाही. ५ वर्षात महापालिकेचे किती नुकसान झाले, याचा विचार केला पाहीजे. एकच प्लॉटधारक न्यायालयात गेलेले होते. दोन्ही नाही. याचा खुलासा अधिकारी यांनी करावयास पाहीजे होता. दोन्ही प्लॉटचे मालक वेगवेगळे आहे. प्लॉट मधून रस्ता गेलेला आहे. २० फुट जागा आहे. लगत प्लॉट नाही. लगतचा प्लॉट घ्यायचा असेल तर रस्ता सुध्दा भूसंपादीत करावा लागेल. १८ वर्षे त्या व्यक्तीने वाट बघीतली. महापालिकेच्या चुकीमूळे त्या मालकास त्रास देत असेल तर चुकीचे आहे. कमर्शियलसाठी समोरचा प्लॉट घ्यायचा असेल तर तो आरक्षणात टाकावा लागेल. तसा निर्णय घेता येणार नाही. मागच्या प्लॉटधारक

यांनी निवासासाठी बांधकाम परवानगीची मागणी केलेली आहे. त्यास परवानगी द्यावी.

श्री.गायकवाड दिलीप : संत एकनाथ महाराज यांचा पुतळा उभरण्याचे राहून गेले. तो पुतळा तयार करून झाकलेला आहे. त्याची आठवण येत नाही का?

मा.महापौर : येत्या २१ तारखेला उद्घाटनाचा कार्यक्रम ठेवलेला आहे.

श्रीमती पाटील अलका : ज्येष्ठ नगरसेवकांनी जे विचार मांडले ते योग्य आहे. ती जागा घेत आहोत, ती वादग्रस्त आहे, असे नमुद केले. तो वाद संपूर्णपणे निवारण झालेला आहे का? यात महापालिकेचा फायदा आहेत का. असेल तर कसा व ही जागा घेण्यासाठी महापालिकेकडे बजेट आहेत का? अधिकाऱ्यांनी जो खुलासा केला तो योग्य वाटत नाही. सविस्तर असा खुलासा अपेक्षित आहे.

मा.महापौर : या विषयावर खुलासा झालेला आहे.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : पूढील बैठक २० तारखेला होईल. १७ जुलै पर्यंत मुदत आहे. आजच्या बैठकीतच निर्णय घेण्यात यावा.

श्री.शिरसाट संजय : समोरचा प्लॉट मालक न्यायालयात गेलेला होता, त्यावर आज निर्णय घ्यावा.

मा.महापौर : सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे व विद्यमान संत एकनाथ रंगमंदिरात उपलब्ध असलेल्या २६९ चौ.मी. पार्कींगची जागेचा विचार करता वाहनतळासाठी दोन भूखंडाची आवश्यकता नाही. फक्त समोरील दक्षिणेकडील भूखंड संपादन करावे. दोन मजली पर्कींग करावी. तळमजला कार पार्कींग व वरच्या मजल्यावर दुचाकी वाहन या दुरूस्ती व स्विकृतीसह मंजूर.

ठराव :

प्रस्तुत प्रस्तावाच्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मौजे उस्मानपुरा येथील बचत भवनासाठी (संत एकनाथ रंगमंदिरासाठी) या ठिकाणी विद्यमान २६९ चौ.मी. वाहन तळासाठी जागा उपलब्ध होत असल्याने प्रस्तावात नमुद केलेले दोन भूखंडाची आवश्यकता नसल्याने समोरील भागातील म्हणजेच दक्षिणेकडील भूखंड नगर भू.क्र.१४४८८/१ क्षेत्र ५३०.६० चौ.मी. जागा संपादन करण्यास आणि या संपादीत होणाऱ्या जागेवर तळ मजल्यावर कार पार्कींग व वरच्या मजल्यावर दुचाकी वाहनासाठी वाहनतळाची व्यवस्था करण्याकरीता न.भू.क्र.१४४८८/१ क्षेत्र ५३०.६० चौ.मी. संपादन करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : आजच निर्णय घ्यावा. भूसंपादन केले नाही तर डिलीट होईल, महापालिकेचा ताबा जाईल. कोणताही प्रस्ताव ३ महिन्यानंतर पुन्हा सुधारीत आणता येतो. रिझर्वेशन नंतर करता येते. तसा प्रस्ताव येऊ शकतो. त्यावर चर्चा करता येईल.

श्री.नरवडे वसंत : मागचा सुध्दा प्लॉट घेण्यात यावा. एक प्लॉट घेऊन पार्कींग करीता पुरेसा होऊ शकतो का ?

श्री.अ.रशिद खॉन (मामु) : दोन्ही प्लॉट घेण्यात यावे.

श्री.देसरडा प्रशांत : माझ्या प्रश्नाचा अद्याप प्रशासनाने खुलासा केलेला नाही. कोर्टात वेळ वाढवून देऊ शकतो.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : ज्याचा प्लॉट घेत नाही तो या सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे न्यायालयात दाद मागू शकतो.

श्री.नरवडे वसंत : दोन प्लॉट खरेदीचा प्रस्ताव आहे. एक प्लॉट घेऊन साध्य होणार आहे का? दोन्ही प्लॉट घ्यावे.

श्री.केनेकर संजय : घ्यायचे असेल तर दोन्ही घ्या. मा.न्यायालयाला निवेदन करण्यांत यावे.

श्री.मुजीब खॉन : एक प्लॉट घेतला तर किती रक्कम द्यावी लागणार आहे. दोन घेतल्यास किती रक्कम, याचा स्पष्ट खुलासा घ्यावा. त्यावर निर्णय घ्यावा. जी व्यक्ती न्यायालयात गेली त्यांचे प्लॉटची किती रक्कम होईल.

श्री.धिल्लन तरविंदरसिंग : दोन्ही प्लॉट भूसंपादन करावे.

श्री.केनेकर संजय : सभागृहाची दिशाभूल होत आहे. अधिकारी व्यवस्थित खुलासा देत नाही.

श्री.ठाकुर पुरूषोत्तम : एम.आर.टी.पी.कलम १२८ नुसार व्यापारी संकुल करता येते. खालच्या बाजूला पार्कींगची जागा ठेवावी. असे नियोजन करता येते.

मा.महापौर : मा.आयुक्त खुलासा करीत आहे.

मा.आयुक्त : यात दोन-तीन मुद्दे लक्षात घेण्याची गरज आहे. संत एकनाथ रंग मंदीरसाठी पार्कींगची जागा आवश्यक आहे. एकूण ९११ चौ.मी. जागेची गरज आहे. २६०-२७० स्क्रे .मी. जागा उपलब्ध आहे. उर्वरीत जागा घ्यावीच लागेल. शहरातील नागरीक तेथे जाणार आहेत शहराचा अधिकार आहे. पार्कींग तेथे घेण्याचा, त्या जागेवर कोणतेही आरक्षण नाही. त्या व्यक्तीने तो ले-आऊट मधील प्लॉट आहे. रंग मंदीराच्या बाजूला आहे. व तो १८ वर्षापासून भांडतो आहे, ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. प्लॉट भूसंपादीत करतांना मूळ मालकास त्याची किमंत तरी द्यावीच लागणार आहे. तो त्याचा अधिकार आहे. संत एकनाथ रंग मंदीरच्या बाजूला रस्त्यावर एक अतिक्रमण आहे. त्या संदर्भात न्यायालयाचे स्थगिती आदेश उठविले आहे. ते काढण्या संदर्भात मी सूचना दिलेल्या आहेत. त्या रस्त्याचा वापर पार्कींगसाठी करू शकतो साधारण ३०० स्क्रे.मी. जागा मिळू शकते. ओपन रस्ता पार्कींगसाठी वापरायचा असेल तर पुन्हा तसा प्रस्ताव येणार, त्यावर हरकती मुद्दे येतील, त्यानंतर अंतिम होईल. शासनाची मंजूरी घ्यावी लागेल, ते झाल्यास कायम स्वरूपी ती रस्त्याची जागा पार्कींगसाठी वापरता येईल. निर्णय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत वापरता येणार नाही. मला खुलासा करू द्यावा. निर्णय सभागृहाचा आहे. जागा घेतली नाही तर संपूर्ण पार्कींग बाहेर रस्त्यावर येईल. अडचणीचे होईल. रस्ता बंद झाला तर ५०० स्क्रे.मी. नाही झाला तर ७०० स्क्रे.मी. ही जागा उपलब्ध करून घ्यावीच लागणार, शहराचा प्रश्न आहे. दोन्ही प्लॉटसाठी जवळपास ६०-७० लक्ष रूपये खर्च येईल. १७ जुलै ही मुदत न्यायालयाची आहे. मला स्वत: शपथपत्र दाखल करायचे आहे. निर्णय घेतले नाहीतर ते ॲटोमेटीक लॅप्स होईल. खाजगी व्यक्तीचे अधिकार व शहराचे अधिकार या दोन्हीचा समतोल ठेऊन निर्णय घ्यायचा आहे. निर्णय न घेणे व लॅप्स होणे हे योग्य होणार नाही. दोन्ही प्लॉटची १००% गरज नाही, ही पण वस्तुस्थिती आहे. त्यात निर्णय असाही घेता येईल की, संबंधीत व्यक्तीने २५% जागा पार्कींगसाठी द्यावी. त्याचा एफ.एस.आय.त्यांना देऊ. त्या व्यक्तीचे नुकसान होणार नाही. ०.४ पर्यंत वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देवू शकतो. उंची वाढवून बांधकाम परवानगी देता येईल. अशी तडजोड करता येईल. परंतु त्या व्यक्तीला समोर बोलवावे लागेल. व त्यास सांगावे लागेल की, आपला खर्च होणार नाही व पार्कींगची जागा सुध्दा उपलब्ध होते. मी स्वत: तेथे पाहणी केली. जागा मिळाल्यास पार्कींगची व्यवस्था होईल, खर्च होणार नाही. व त्या व्यक्तीची जागा सुध्दा अबाधीत राहते. तेथील रस्त्याची आज गरज नाही. तसा निर्णय घेऊ शकता. रस्ता बंद करण्यास प्रसिध्दी लागेल. यानंतर हरकती/सूचना मागता येईल व पुन्हा आपल्या निर्णयासाठी ठेवता येईल. ३२५ ते ३३० स्क्रे.मी. जागा रंगमंदीराच्या एका बाजूला उपलब्ध होऊ शकते. यामूळे पार्कींग भागात वाढ

होईल. हायकोर्टाच्या निर्देशानुसार निर्णय घ्यायचा आहे. हा प्रस्ताव मंजूर करावा. संबंधीत व्यक्तीला बोलावून तडजोड करून महापालिकेचे ६०-७० लक्ष बचत होत असतील तर चांगली बाब आहे. मंजूर केले तर त्या व्यक्तीवर तडजोड करण्याचे थोडेफार प्रेशर असेल.

श्री.शिरसाट संजय : अत्यंत चांगला खुलासा मा.आयुक्त यांनी केलेला आहे. एकाच प्लॉटची सध्या गरज आहे.आवश्यक असलेला प्लॉट घेण्यात यावा व रस्त्यापलिकडील जो प्लॉट आहे, त्यात अतिक्रमण असून सोडून देण्यांत यावा.

श्री.नरवडे वसंत : या प्रस्तावात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे २ प्लॉट बाबतची डिमांड केलेली आहे. दोन्ही प्लॉट घ्यावे, अशी मागणी आहे. प्रशासकीय प्रस्ताव आहे. दोन प्लॉट नमुद केलेले असतांना एकच प्लॉट घेण्याचा निर्णय घेऊ नये. या मागचे कारण काय? या शहराची वाढीव लोकसंख्या विचारात घेता,दोन्ही प्लॉट खरेदी करावे. पार्कींगची व्यवस्था ही कायम स्वरूपी लागणार आहे.

मा.महापौर : या विषयावर निर्णय झालेला आहे. पुढील विषयावर बोलावे.

(याचवेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठ्याने बोलतात,काहीही ऐकू येत नाही. या विषया संदर्भाने मतदान घ्यावे अशी मागणी करतात.)

श्री.कुचे नारायण : १९८७ च्या रेडीरेकनर प्रमाणे रक्कम देण्यांत यावी. दोन्ही प्लॉट घेण्यात यावे. संबंधीत व्यक्ती कोर्टात गेलेले होते, त्यास गरज होती. सभागृहाची दिशाभूल करू नये. मतदान घ्यावे. चांगले निर्णय घ्यावे.

मा.महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे, निर्णय झालेला आहे.

श्री.नरवडे वसंत : एकच प्लॉट का घेत आहात खुलासा करावा. प्रस्ताव दोन प्लॉटचा कसा सादर केला,निर्णय काय घेतला,खुलासा करावा.

श्री.देसरडा प्रशांत }
श्री.केनेकर संजय } : यावर मतदान घ्यावे, त्यानुसार निर्णय घ्यावा.

श्री.सलीम खान : दोन्ही प्लॉट घेण्यात यावे.

श्री.नरवडे वसंत : प्रस्ताव दोन प्लॉटचा सादर केलेला असून एक प्लॉट घेतला व दुसरा आरक्षण केल्यास संबंधीत प्लॉटधारक किंवा इतर कोणी व्यक्ती न्यायालयात याचिका दाखल करेल व आपण घेतलेल्या परिस्थितीला अडचणीत आणेल, हे लक्षात घ्यावे.

मा.महापौर : सध्या तेथे दोन प्लॉट आहे. दोन प्लॉटच्यामध्ये एक रस्ता आहे. एक प्लॉट व रस्त्याची जागा पुरेशी आहे. असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे. दोन्ही प्लॉटची पार्कींगसाठी आवश्यकता नाही. शंका घेण्याचे कारण नाही. सभागृहाचे एकमत झाल्यास दोन्ही प्लॉट डिलीट करण्याची तयार आहे. दोन प्लॉट आहे. पार्कींगच्या जागेची आवश्यकता आहे. एक प्लॉट मिळाला तरी पुरेसा आहे, असे प्रशासनाचे मत आहे. सर्व सभागृहाचे मत समोरचा प्लॉट घेणे आहे. पाठीमागचा प्लॉट डिलीट करतो,तसा निर्णय दिलेला आहे. सभागृहात सर्वांचे एकमत व्हावे. आणखी काही कूणास बोलावयाचे असल्यास जागेवर उभे राहून मत मांडावे.

श्री.नरवडे वसंत : शंका घेण्याचे कारण नाही. कारण हा प्रशासकीय प्रस्ताव आहे. शासकीय अधिकारी व आपण पदाधिकारी या प्रस्तावाच्या बाबतीत एकत्र आहोत असे निदर्शनास येते. दोन प्लॉटचा प्रस्ताव येतो, तेंव्हा अधिकाऱ्यांशी चर्चा करणे आपण गरजेचे होते. सभागृहात जेंव्हा प्रस्ताव येतो तेंव्हा वाणिज्य वापर व निवास वापर चा मुद्दा उपस्थित होतो, हे बरोबर नाही.

मा.आयुक्त : बाजूचा रस्ता बंद करून ती जागा वापरात घेतल्यास एकच प्लॉटची गरज आहे. बंद झाला नाही तर काही जागेची गरज भासेल.

श्री.नरवडे वसंत : गेल्या १५ वर्षात किती लोकसंख्या वाढ झाली व १० वर्षात किती होणार याचा खुलासा घ्यावा व दोन प्लॉट खरेदीचा प्रस्ताव का मांडण्यात आला,याचाही खुलासा घेण्यात यावा.

श्री.अजीज जहागिरदार : ही सर्व चर्चा कोर्टाच्या पिटीशनमध्ये आहे. आरक्षण करण्याबाबतची बाब न्यायालयाने फेटाळून लावली. संबंधीत मालकाचे वकील व महापालिकेचे वकील यांनी सर्व मुद्दे मांडलेले आहे. ही सर्व चर्चा केल्यानंतर न्यायालयाने रिट पिटीशन फेटाळले व हे सर्व ऐकून न्यायालयाने असे म्हटले की, हे भूसंपादन ४ महीन्यात करून घ्यावे. न्यायालयाचे आदेश आहेत, ते आदेश पाळले नाही तर कन्टेम ऑफ कोर्ट होऊ शकते.

मा.आयुक्त : न्यायालयाने असे म्हटले आहे की,एकतर ही जागा विकत घ्यावी नसता त्या मालकास परवानगी दयावी रस्ता बंद केला तर जागेची गरज नाही.

श्री.अजीज जागीरदार : रस्ता बंद करता येणार नाही असे गृहीत धरून दोन्ही प्लॉट घेण्यात यावे.

श्री.घडमोडे भगवान : या विषयावर सविस्तर अशी चर्चा होते आहे. दोन्ही प्लॉट आरक्षण करायचे झाल्यास महानगरपालिकेकडे १०००/- कोटी रूपये लागतील इतके आरक्षणाचे प्रस्ताव आहे तेव्हढी रक्कम महानगरपालिका देऊ शकते का ?मा.आयूक्त यांनी सूध्दा मत व्यक्त केले की दोन्ही प्लॉटची गरज नाही या शहराचा विकास करायचाअसेल तरसर्वच बाबीचा विचारकरणे गरजेचे आहे संत एकनाथ रंग मदीरातील आसन संख्येत वाढ होणार आहे का ?तसे असेल तर जागा लागेल आसन संख्येत वाढ होणार नसेल तर जागेची गरज नाही.एखादया व्यक्ती ती जागा डेव्हलप करणार असेल व त्यास एका कागदावर १८-२० वर्षापासून अडकून ठेवणे बरोबर नाही कूणाची ही जागा असती तर महानगरपालिकेसी वाद केला असताच शंका घेत राहील्यास हे सभागृह चालणे अडचणीचे होईल जेव्हढी जागा आवशक आहे तेव्हढीच घ्यावी असे माझे मत आहे.

श्री.गायकवाड दिलीप : या शहराची लोकसंखया झपाटयाने वाढत आहे दोन्ही प्लॉट घेण्यात यावे.

श्री मुजीब खॉन : सदर प्लॉट हे ले आऊट मधील असून दोन्ही प्लॉट मधील जो रस्ता जातो तो बंद करता येतो का ? कोणत्या नियमानूसार खुलासा करावा सदर रस्ता हा नागरीकासाठी केलेला आहे तो खुलाच ठेवावा लागणार आहे बंद करू शकत नाही त्यासाठी आजच विचार करणयाची गरज आहे की भविष्यात किती जागा पार्कींग साठी लागणार आहे लेआऊट मधील रस्ता बंद करू शकतो का खुलासा करावा.

श्री.अब्दुल रशिद खॉन :सभागृहात काही सदस्य एकच प्लॉट भूसंपादन करण्याची सूचनाकरीत आहे मा.आयुक्त यांनी सूध्दा खूलासा केलला आहे एक प्लॉट खरेदी करणार, एक नाही लोकांच्या मनात शंका निर्माण होऊ शकते दोन प्लॉट घेण्याचा प्रस्ताव आहे दोन्ही प्लॉट खरेदी करावे असे सर्वच सदस्याचे मत आहे आपले एक प्लॉट संपादन करावे म्हणून मत आहे सर्वांना सोबत घेवून चलावे .

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : दोन्ही प्लॉट घ्या.

मा.महापौर : जेव्हढी जागा आवश्यक आहे, निर्णय घेण्यात आलेला आहे. १५ मिनीटासाठी सभा तहकूब करण्यांत येते.

(वेळ सायं.७.०० वाजता सभेला सुरूवात ७.४५ वाजता)

श्री.देसरडा प्रशांत : या विषयावर माझा विरोध नोंदविण्यात यावा.

श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग : आमचा विरोध नोंदवा.

विषय क्र. २१/३ :

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार ६० मीटर रूंद रस्ता पैठण रोड ते बीड बायपास या रस्त्याने मौजे इटखेडा येथील मिळकती बाधित होतात. त्यापैकी सर्व्हे क्रमांक ६२/१ व ६२/२ या मिळकतधारकाने उक्त प्रस्तावाने बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी महाराष्ट्र व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सूचना दिनांक २६/०५/१९९७ रोजी शासनास बजावलेली असून दिनांक २५ नोव्हेबंर १९९७ रोजी शासनाने उक्त खरेदी सूचना कायम केल्यानूसार भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे कालमर्यादेत म्हणजेच खरेदी सूचना कायम झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत म्हणजे दिनांक ०१.०६.१९९८ रोजी पाठविण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडून पूढील कार्यवाहीसाठी विशेष भूसंपादन अधिकारी,विशेष घटक,औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०३.१०.१९९८ रोजी वर्ग झालेली आहे.

विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक यांनी प्रकरणांत संयूक्त मोजणी करणेसाठी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख औरंगाबाद यांना दिनांक ०१.१२.१९९८ रोजी कळविलेले आहे. त्याप्रमाणे प्रकरणांत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख औरंगाबाद यांनी दिनांक २२.१०.१९९९ रोजी संयूक्त मोजणी करून मोजणी नकाशा व अहवाल दिनांक १०.११.२००० रोजी सादर केलेला आहे.

उपरोक्त संयूक्त मोजणी अहवालानुसार पूढील भूसंपादनाची कार्यवाही करणेसाठी म्हणजेच कलम ४ व कलम ६ ची अधिसूचना प्रसिध्द करणेसाठी भूसंपादन संस्थेने (महानगरपालिकेने) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील निर्णय क्रमांक एलक्यएन/१८/२०००/प्र.क्र.-१२१/अ-२, दिनांक १४.०६.२००१ अन्वये अंदाजित मावेजा रक्कमेच्या २/३ रक्कम भरणे आवश्यक आहे. त्यानुसार विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./२७२, दिनांक १२.०४.२००२ अन्वये प्रकरणात २/३ रक्कम रूपये ४.५० कोटी (रूपये चार कोटी पन्नास लाख) मागणी केलेली आहे. उक्त २/३ रक्कम रूपये ४.५० कोटी एवढी मोठी रक्कम अदा करणे महानगरपालिका आर्थिक क्षमता नसल्यामूळे पाठवता आलेली नाही.

दरम्यान रिट याचिका क्रमांक ५३१/२००२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने औरंगाबाद शहराची मंजूर विकास योजना अंमलबजावणी अहवाल सादर करणे बाबत आदेशित केलेले होते. त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयात दहा वर्षाकरीता विकास योजना अंमलबजावणी अहवाल सादर केलेला आहे. त्यात सदर रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही सन २००५-२००६ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. त्यामूळे अर्जदाराने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८७ तसेच सिव्हील प्रोसीजर कोडचे कलम-८० नुसार नोटीस बजावलेली असून मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक २७६४/२००४ अन्वये दाखल केलेली आहे.

मा.उच्च न्यायालयात सदर याचिका दिनांक २५.०४.२००५ रोजी सुनावणीस निघाली असता प्रकरणात वरील रक्कम निश्चित केंव्हा जमा करण्यात येईल, याबाबत निश्चित कालावधीसाठी प्रतिज्ञा पत्र दाखल करणे बाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहे व प्रकरण दिनांक ०८.०६.२००५ रोजी मा.उच्च न्यायालयाने परत सुनावणीसाठी ठेवलेले आहे.

तथापी उपरोक्त ६० मीटर रूंद रस्त्यावरील आरक्षण पाहता आरक्षण क्रमांक डी/डी पोलीस स्टेशन व आरक्षण क्रमांक डी/ई सरकारी कार्यालय व कर्मचारी निवास स्थान आरक्षण क्रमांक डी/जी गार्डन अशी आहेत. त्यापैकी आरक्षण क्रमांक डी/एफ हे आरक्षण रद्द झालेले आहे. त्यामूळे पोलीस स्टेशन व बस स्टेशन या आरक्षणासाठी व गार्डनसाठी वरील रस्त्याचे भूसंपादन करावे लागणार आहे.

करीता उपरोक्त आरक्षण (पोलीस स्टेशन व बस स्टेशन) या आरक्षणाखालील जमिन संपादन केंव्हा करणार ? याबाबत मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद व विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांनी लेखी विचारणा केलेली आहे. अद्याप त्यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

करीता उक्त रस्त्याचे भूसंपादन प्रकरणी २/३ रक्कम रूपये ४.५० कोटी (अक्षरी रक्कम रूपये चारशे पन्नास लक्ष फक्त) जमा करणेस्तव व पूढील कार्यवाहीस्तव व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास २००५-२००६ या चालू आर्थिक वर्षात मान्यता देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.तुपे त्रिबंक : हा भूसंपादनाचा विषय आहे. भूसंपादन करून हा रस्ता करणे गरजेचे आहे का? यासाठी जवळपास ४.५० कोटी रूपये द्यावे लागेल,तशी परिस्थिती महापालिकेची आहे का? या ही पेक्षा या शहरातील फार दिवसापासून रस्त्याची दुरूस्ती केलेली नाही. ४.५० कोटी रूपये देण्याचा हा ठराव कितपत योग्य आहे. लक्ष्मणचावडी ते एम.जी.एम.पर्यंतचा रस्ता हा फार जूना रस्ता आहे. कैलास स्मशानभूमीकडे जाणारा हा महत्वाचा रस्ता असतांना काहीही कार्यवाही केलेली नाही. त्या रस्त्याने अंत्ययात्रा जाते ५-५, १०-१० मिनिटे लोकांना थांबावे लागते. जे महत्वाचे रस्ते आहेत ते अगोदर करण्यात यावे. या रस्त्याची गरज असेल तर तसा खुलासा प्रशासनाचा घेण्यात यावा.

श्री.सलीम खान : रस्त्याची गरज आहे का? सदर जागा महापालिकेकडे हस्तांतर झालेली आहे का? खुलासा करावा. किती जागेवर आरक्षण आहेत, सदर जागेची किमंत किती आहे.

सौ.मोमीन सफिया : ६० मीटर रूंद रस्त्याचा हा प्रस्ताव दिशाभूल करणारा आहे. बीड बायपास रस्ता महानुभव आश्रम ते मराठवाडा कृषी विद्यालय पैठण रोड पर्यंत अगोदर झालेला आहे. त्यामुळे सदरील रस्त्यासाठी मिळकती भूसंपादन केल्यास यात महापालिकेचे नुकसान होणार आहे. यावर विचार करावा.

सौ.घोडेले अनिता : विषय क्र.३ मधील सर्वे नं.६२/१ व ६२/२ मौजे विटखेडा भागातील ६० मीटर रूंद विकास रस्ता भूसंपादनाच्या प्रस्तावामध्ये २/३ (दोन तृतीयांश) रक्कम रू.४.५ कोटी मान्यतेकरता सभागृहासमोर प्रशासनाने ठेवला आहे. सदरील प्रस्तावातच प्रशासनाने महानगरपालिकेची आर्थिक क्षमता नसल्याचे म्हटले आहे. दरम्यान मा.उच्च न्यायालयात मिळकतधारकाने याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने २/३ रक्कम केंव्हा भरणार असल्याबाबत महानगरपालिकेकडे विचारणा केली आहे/ आदेशित केले आहे. सदरील प्रकरणांत मा.उच्च न्यायालयाचे आदेश हे तात्पुरत्या स्वरूपाचे आहेत. मिळकत धारकाच्या याचिकेवर सुनावणी होऊन अंतिम आदेश बाकी आहेत. कृपया याची नोंद घेवून महानगरपालिकेच्या वतीने मा.उच्च न्यायालयाकडे विनंती करण्यात यावी की, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने व भविष्यात शहरात टी.डी.आर.लागू करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे विचाराधीन असल्याने तूर्त सदरील भूसंपादनाची याचिका प्रलंबीत ठेवावी. सदरील परिसरात प्रस्तावित ६० मीटर रूंद विकास रस्त्याची आवश्यकता आहे किंवा नाही याची सक्षम/तज्ञ अधिकाऱ्याकडून फेर तपासणी करून घ्यावी व तसा अहवाल सभागृहासमोर ठेवावा व या भूसंपादन प्रकरणांत एका कमीटीची स्थापना करावी व कमीटीत मा.महापौर साहेबांसह सर्व सन्माननीय पदाधिकारी, माननीय आयुक्त यांचा व या भागातील सन्माननीय नगरसेवकाचा समावेश करून स्थळ पाहणी करून कमीटीचा सविस्तर अहवाल आल्यानंतरच या प्रस्तावाबाबत निर्णय घ्यावा, तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा, ही विनंती.

श्री.मुजीब खान : या प्रस्तावा संबंधीचा नकाशा सभागृहात लावलेला नाही. किती रक्कम देणार आहोत, किती लोकांच्या मिळकती येतात,कोणत्या सर्वे नंबर मधील आहेत. एकूण क्षेत्रफळ किती, प्रस्तावात काहीही दिलेले नाही. खुलासा घ्यावा.

श्री.ठाकुर पुरूषोत्तम : या रस्त्यामूळे सध्यस्थितीत व भविष्यात किती फायदा जनतेला होणार आहे, खुलासा घ्यावा नसता या रक्कमेत पाणी पुरवठा, साफसफाई, विद्युत यास अत्यावश्यक सेवा म्हणून प्राधान्य देऊन ही कामे करावीत.

श्री.अ.रशिद खॉन मामु : यापूर्वी सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे की, असे प्रस्ताव ठेवतांना पूर्ण नकाशासहीत ठेवावे. नकाशा का दिलेला नाही. तसेच बीड बायपास ते उड्डाणपुला पर्यंत रस्ता झालेला आहेत तसेच पैठण रोड कृषी विद्यापीठ पर्यंतही रस्ता अगोदरच झालेला आहे, त्याचा समावेश का करण्यात येत आहे.

मा.महापौर : यापुढे असे प्रस्ताव ठेवतांना नकाशासहीत प्रस्ताव ठेवावे, प्रशासनाचा खुलासा घेऊन त्यानंतर यावर चर्चा करता येईल.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर कोणास फायदा होणार आहे. ज्या मिळकती येतात ते त्या कोणत्या व कुणाच्या आहेत, संपूर्ण माहिती समोर ठेवावी. जागा भूसंपादन करून सक्षम करण्या इतपत महापालिकेची आर्थिक परिस्थिती तशी नाही किमान एक वर्षानंतर तरी आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर या प्रस्तावावर विचार करावा. तोपर्यंत कुठलाही भूखंड महापालिकेने घेऊ नये, असे माझे मत आहे.

श्री.अ.रशिद खॉन मामु : प्रस्तावित २००२ मधील आहेत. तेंव्हा पासून प्रशासन गप्प का. प्रस्ताव येण्यास उशीर का झालेला आहे. जो मोबदला देणार तो केंव्हा पासूनचा देणार आहात.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा करावा. न्यायालयातील परिस्थिती काय आहे. सविस्तर खुलासा व्हावा.

सहा.संचालक न.र. : ६० मीटर रूंद रस्ता वाढीव विकास योजना हद्दी मधील हा रस्ता आहे. पैठणरोड ते बीड बायपास असा हा रस्ता आहे. यामध्ये ६७३०० चौ.मी.जागा येते. जे जमीन मालक आहे. त्या बाबतीत मोजणी नकाशा झालेला आहे. यातील १.२३ हेक्टर एवढ्या जमीनीचे मालक मुस्तफा महेमूद फॅमीली असून ते मा.उच्च न्यायालयामध्ये गेलेले होते २/३ रक्कम एस.एल.ओ.कडे जमा करायची आहे. २/३ रक्कम भरण्याबाबत निश्चित कालावधी करण्या संदर्भात ८ तारीख दिलेली होती. बजेट मंजूर नाही. म्हणून हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे सादर करावा लागला, संबंधीत मालकाने विकास योजना मंजूर झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९४९ चे कलम ४९ ची नोटीस दिलेली होती.

श्री.कराड भागवत : सभागृहाच्या भावना लक्षात घेता व महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता व ईटखेडा भागात फारसा विकास झालेला नाही. अशा परिस्थितीत ४.५ कोटी रूपये खर्च करू नये. पिण्याच्या पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यावर खर्च करण्याची गरज आहे. टी.डी.आर. मंजूर झाला तर हा प्रस्ताव मंजूर करता येईल. प्रशासनाने नाविलाजाने प्रस्ताव आणलेला असेल, कारण उद्या हेच सभागृह विचारू शकते प्रस्ताव का आणलेला नाही. त्यासाठी हा प्रस्ताव स्थगित करावा व महापालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा.

श्री.कोकाटे काशिनाथ : विकास आराखड्यानुसार हा रस्ता ६० मीटर रूंद असावा असे आहे. त्यावेळी उड्डाणपुल झालेला नव्हता. त्यावेळी तेथील रहदारीचा व डी.पी.रोड नमुद करतांना सर्वे केला असेल ते विचारात घेतलेले नाही. त्या भागातील रहदारी बघीतलीतर ६० मीटर रस्ता करण्याची आवश्यकता नाही. काही मिळकतधारक

न्यायालयात गेले. न्यायालयाच्या आदेशानुसार प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे. विकास आराखड्यामध्ये रस्ता नमुद केला, परंतू रस्त्याच्या जागेचे रूंदी कमी जास्त करायचे झाल्यास तसा प्रस्ताव मंजूर करून तो शासनाकडे पाठवावा लागणार आहे. अंतिम मंजूरी ही शासनाची लागणार आहे. ६० मीटर ऐवजी ३० मीटर रस्ता करण्यात यावा, शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावा. त्याप्रमाणे न्यायालयात महानगरपालिकेने आपल्या वतीने बाजू मांडावी. शासनाचे जे निर्देश येईल त्यानुसार पुन्हा सभागृहासमोर हा प्रस्ताव सादर करावा.

श्री.अ.रशिद खॉन मामु : २००२ चा हा प्रस्ताव आहे. तेंव्हा पासून थांबवून आहे. सर्वे नंबर मोजणी केली का? माझ्या माहितीप्रमाणे नाल्याची जमीन आहे. यात गायरान जमीन किती आहे. नाल्याची जमीन असेल तर गायरान जमीन कुठे गेली. नाल्याच्या जागेत व गायरान जमीनीवर रस्ता होतो ४ कोटी देण्याची गरज नाही.

सहा.संचालक न.र. : जागेवर मोजणी झालेली आहे. जागेची मोजणी करण्याचे अधिकार टी.आय. एल. आर. यांना आहे.

श्री.बारवाल गजानन : ईटखेडा व बीड बायपास हा परीसर मोठ्या प्रमाणात वाढत जात आहे. ले-आऊट करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे निश्चितपणे आज तेथे रस्त्याची आवश्यकता आहे. ६० ऐवजी ३० मीटर रस्त्याची आवश्यकता आहे. बजेट नाही असे म्हणणे योग्य नाही. अनेक वर्षापासून या रस्त्याबाबत कार्यवाही चालू आहे. अनेकवेळा मोजणी वगैरे झालेली होती. नम्र विनंती आहे की,३० मी. प्रस्तावित करावा.

श्री.अ.रशिद खॉन मामु : यातील गायरान जमीन किती येते, याचा खुलासा घ्यावा.

सहा.संचालक न.र. : याबाबत तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडून मोजणी झालेली आहे. मोजणीचा अहवाल व नकाशा दिलेला आहे.

श्री.मुजीब खॉन : क्षेत्रफळ किती, कोण कोण मालक आहेत. पूर्ण माहिती नाही. दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रस्ताव ठेवतांना सर्व माहिती समोर ठेवली पाहीजे.

श्री.बारवाल गजानन : न्यायालयाने ८ तारीख दिलेली होती. न्यायालयातील परिस्थिती काय, तो पण खुलासा करण्यांत यावा.

सहा.संचालक न.र. : याबाबत न्यायालयाने तीन आठवड्याची मुदत वाढवून दिली आहे.

सौ.मोमीन सफिया : विषय क्र.३ हा दिशाभूल करणारा प्रस्ताव आहे. बीड बायपास महानुभव आश्रम कृषी विद्यापीठ पैठण रोड पर्यंत रस्ता अगोदरच पूर्ण झालेला आहे. जमीन महानगरपालिका भूसंपादीत करणार असेल तर यात महानगरपालिकेचे नुकसान होईल. सहा.संचालक नगर रचना यांनी स्थळ पाहणी न करताच प्रस्ताव ठेवलेला दिसतो. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी सातारा परीसर ते पैठणरोड व तेथून नगर रोड पर्यंत बायपास रस्ता केलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेस या रस्त्याची काही आवश्यकता नाही. हा खर्च शहरातील इतर कामासाठी खर्च करावा शहरात आजही अनेक भागात पाणी नाही. पाण्यासाठी नागरीकांना दूरदूर जावे लागते. काही भागात लाईट व्यवस्था नाही. काही भागात रस्ते नाही. पायदळ चालण्यास सुध्दा त्रास होतो. काही भागात ड्रेनेज लाईन नाही. तेथे हा पैसा खर्च करावा. विषय क्र.३ मंजूर करू नये. महानगरपालिकेमार्फत त्या रस्त्याचे काम होऊ नये. बाधीत मिळकतीचे भूसंपादन होऊ नये.

श्री.नरवडे वसंत : सर्वे नं.६१/१,६२/२ या प्रशासकीय प्रस्तावामध्ये दि.१२.०४.२००० ला २/३ रक्कम रू.४.५० कोटी रूपयाची मागणी केलेली असतांना ४.५० कोटी रूपये

महानगरपालिकेची आर्थिक क्षमता नसल्यामूळे भरता आली नाही. असे मागच्या वेळेस न्यायालयास सांगितले पुन्हा ८.६.२००५ रोजी सुनावणी निघाली असता, सदर रक्कम निश्चित केंव्हा भरण्यात येईल. हा निश्चित कालावधी आपल्या आर्थिक क्षमतेचा आढावा घेऊनच करावा. रस्त्याच्या मेनरोडच्या बाजूची बाधीत जेव्हढी जागा आहे, तेव्हढीच जमीन घेण्यात यावी, हा प्रस्ताव तसा मंजूर करावा.

श्री.देसरडा प्रशांत : संबंधीत मालक जेंव्हा महानगरपालिकेस नोटीस देऊन जागा भूसंपादन करावी म्हणून सांगतात, तर त्या भागात महानगरपालिकेने परवानगी दिलेले ले-आऊट भूखंड नाही का? त्या भागात इतर लोक कॉलनीमध्ये राहतात की नाही याचा पंचनामा करून सहा.संचालक यांनीच या मालकास नोटीस देऊन कळवावे की, सध्या या रस्त्याची विकास करण्याची आवश्यकता नाही. प्रशासनामार्फत तसे त्या जमीन मालकास कळवावयास पाहीजे. परंतु तसे होत नाही. नोटीस दिली की, तसा प्रस्ताव डायरेक्ट सर्वसाधारण सभेपूढे सादर होतो. डी.पी.प्लॅन मंजूर असला तरी प्रशासनाचे काय मत आहे, ते घेण्यात यावे.

मा.महापौर : डी.पी.प्लॅन जेंव्हा तयार होत होता तयार करून जेव्हा पाठवला होता तेव्हा हा रस्ता ६० मीटर की ३० मीटर होता.

सहा.संचालक न.र. : ३० मीटर होता.

मा.महापौर : माझ्या माहितीप्रमाणे वाढीव हद्दीची विकास योजना शासनाला मंजूसाठी पाठविली होती,त्यावेळी हा रस्ता १०० फुट होता. शासनाने आपल्या स्तरावर २०० फुट केला. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सद्या येथे २०० फुटाची गरज नाही. त्यामूळे १०० फुट रूंदीचा रस्ता करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करावी लागेल व तुर्त १०० फुट रस्ता संपादन करण्याची कार्यवाही करावी व १०० फुट रूंद रस्ता भूसंपादनातुन वगळण्यात यावे.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पैठण रोड ते बीड बायपास या ६० मी. रूंद रस्त्याची सध्या ६० मी.रूंद करण्याची गरज नसल्याने हा रस्ता ३० मी.रूंद (१०० फुट) करण्यास व ३० मी.रूंद रस्त्याखालील क्षेत्र भूसंपादनातुन वगळण्यास आणि ३० मी.रूंद रस्ता ठेवणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे कार्यवाही करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>चर्चा :</u>

श्री.जोशी संजय : न्यायालयातील परिस्थिती काय आहे.

सहा.संचालक न.र. : न्यायालयाने असे निर्देश दिले की,२/३ रक्कम किती कालावधीत भूसंपादन अधिकारी यांचेकडे जमा करणार आहात.

श्री.जोशी संजय : यात पोलीस स्टेशन व एस.टी.महामंडळाची जागा येते का? त्यांचेसाठी हे भूसंपादन करणार आहोत का?

सहा.संचालक न.र. : यात पोलीस स्टेशनची जागा येत नाही. तो विभाग त्याची स्वत: जागा भूसंपादीत करेल.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : न्यायालयास नकारार्थी काही कळवू शकत नाही का? ही जागा घेऊ शकत नाही असे कळवावे. एक वर्ष थांबवावे.

सौ.घोडेले अनिता : ४.५० कोटी रूपये भरण्यास महापालिकेची आर्थिक स्थिती नाही. त्यासाठी हा प्रस्ताव स्थगीत ठेवावा.

मा.महापौर : ८ तारखेला कोर्टात प्रतीज्ञापत्र द्यायचे आहे. स्थगीत करता येत नाही.

श्री.नरवडे वसंत : सन २००५-२००६ चे आर्थीक नियोजन झालेले नाही.मंजूरी नाही. या प्रस्तावा बाबत किती रक्कम लागणार याबाबत चर्चा झालेली आहे का? मागच्या वेळेस न्यायालयास असे सांगण्यात आले की, महापालिकेची आर्थीक परिस्थितीमुळे भरू शकत नाही.याही वेळेस तसे कळवावे की, वर्ष, दोन वर्ष रक्कम जमा करू शकत नाही.

श्री.जोशी संजय : पोलीस स्टेशन व बस स्टेशन यांचेसाठी भूसंपादन करावे लागेल, स्पष्ट दिलेले आहे.

सहा.संचालक न.र. : त्यांचेसाठी म्हणून हा रस्ता नाही. बीड बायपास व पैठण रोड सूध्दा त्यास जोडलेला आहे. वाहतूकीच्या दृष्टीने दूसरा ३० मीटरचा रस्ता यास लागून आहे. त्या बाबतीत भूसंपादन करण्याची कार्यवाही चालू आहे.

मा.महापौर : २०० फुट ऐवजी १०० फुट रस्ता रूंद करण्यात यावा. कलम ३७ प्रमाणे कार्यवाही करावी.

<u>विषय क्र. २२/४ :</u>

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नवभारत निर्माणाचे महान कार्याचे अभ्यासासाठी विचारवंताना व्यासपीठ निर्माण व्हावे या उदात्त हेतूने मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र निर्माणाचे कार्य हाती घेतले आहे. या दृष्टीने संशोधन केंद्र कार्यान्वीत करण्यासाठी पुढील उद्दीष्टे/कार्य करण्यासाठी मानस आहे.

१. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नवभारत निर्माण कार्याचे वैचारीक व्यासपीठ म्हणून संशोधन केंद्र कार्यरत राहील.

२. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र महानगरपालिका औरंगाबाद, केंद्राचे प्रशासकीय कामकाज, व्यवस्थापन इत्यादीसाठी महानगरपालिकचे विभाग प्रमुख दर्जाचे अधिकारी यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली जाईल. सदर व्यवस्थापकीय संचालकास मराठी, इंग्रजी, हिंदी यासह उर्दू भाषा अवगत असणे (किमान उर्दू वाचता येणे) आवश्यक राहील. प्रथम ही नियुक्ती पाच वर्षासाठी असेल. नियुक्ती देणे, मुदतवाढ देणे इत्यादी सर्व अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. नगर सचिव यांना प्रथमत: व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते.

३. सल्लागार समितीचे सदस्य निवडण्याचा अधिकार मा.आयुक्तांना राहील. त्याचा सल्ला स्विकारणे महानगरपालिका आयुक्तांवर बंधनकारक राहणार नाही. सल्लागार समितीचे सदस्यांना इतर भाषासह उर्दू भाषा अवगत असणे अनिवार्य राहील.

४. संशोधन केंद्र प्रमुख म्हणून व्यवस्थापकीय संचालक राहतील त्यांना समन्वयक सहाय्य करतील. संशोधन केंद्राची कामे महानगरपालिकेचे आयुक्त यांचे मार्गदर्शनानुसार व्यवस्थापकीय संचालक पाहतील.

५. समन्वयक यांची नेमणूक मानद स्वरूपाची असेल, महानगरपालिका आयुक्तांना नियुक्ती करण्याचा अधिकार राहील व नियुक्तीचे निकष खालील प्रमाणे राहतील,

अ. प्रथम नियुक्ती सहा महिन्यासाठी असेल. मुदतपूर्व नियुक्ती रद्द करणे, मुदतवाढ देणे, नविन नियुक्ती करणे इत्यादी सर्व अधिकार महापालिका आयुक्तांचे राहतील.

ब. शैक्षणिक अर्हता :-
१. कला शाखेची पदवी आवश्यक, पदव्युत्तर पदवी, पी.एच.डी.धारक यांना प्राधान्य राहील.
२. इतर भाषा सोबतच उर्दू भाषेचा व्यासंग व अनुभव असावा.
३. प्रशासकीय जबाबदारीचे पदावरील किमान दहा वर्षाची सेवा असणाऱ्या निवृत्त अधिकारी देखील नियुक्तीसाठी पात्र राहतील.
४. वयाची अट राहणार नाही. काम करण्याची शारीरीक सदृढता पाहुन नियुक्ती देण्यांत येईल.

५. लिखाण व साहित्य यांची आवड असावी.

६. समन्वयक यांना एकूण मानधन प्रतिमाह रू.५,०००/- एवढे राहल, महानगरपालिका सेवेतील कोणत्याही सवलती व फायदे लागु राहणार नाहीत.

७. समन्वयक यांनी व्यवस्थापकीय संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापन व सल्लागार या सेवेत पुढील कर्तव्ये समाविष्ट राहतील.

१. संशोधन केंद्रास भेट देणाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे.

२. केंद्राचे उद्दीष्ट पूर्तीसाठी उपक्रमांची अंमलबजावणी करणे.

३. संशोधन केंद्राचे उद्दीष्टांशी सुसंगत वैचारीक ग्रंथ संपदा व साहित्य वा कलाकृती खरेदी करणे किंवा देणगी स्वरूपात स्विकारणे.

४. संशोधन केंद्राचे उद्दीष्ट पूर्तीसाठी समन्वयक यांनी व्यवस्थापकीय संचालक यांचे मार्फत मा.आयुक्त यांचे मंजूरी अधीन समयबध्द कालावधीत विचारवंताची व्याख्याने,चर्चा सत्रे, परिसंवाद,कार्यशाळा आयोजन करणे आणि संशोधन केंद्राचे उद्दीष्टा अनुरूप प्रबंध,लेख व साहित्य संकलीत करणे व प्रकाशीत करणे.

५. या संबंधीच्या कार्याचा मासिक अहवाल मा.आयुक्तांना सादर करणे.

८. उत्कृष्ट साहित्य कलाकृती पुरस्कारीत करण्यासाठी खर्चाची मर्यादा पुढे नमुद केल्याप्रमाणे राहील.

अ. संशोधन केंद्राची कार्य स्वरूपात साहित्य प्रकाशनासाठी प्रतिवर्षी रू.२५,०००/- मर्यादेत खर्चास मान्यता राहील.

९. संशोधन केंद्राचे कार्याचा भाग म्हणून उत्कृष्ट साहित्य निर्मितीस चालना देण्यासाठी पुरस्कार स्वरूपात पुढील खर्चास मान्यता राहील. उत्कृष्ट साहित्याचे निकष व्यवस्थापकीय संचालक व सल्लागार समिती यांनी निश्चित केल्याप्रमाणे राहील व महापालिका आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक असेल.

१०.संशोधन केंद्रातर्फे उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी

अ. आंतरराष्ट्रीय पुरस्कार रू.१,००००००/- (रूपये एक लक्ष) रक्कमेचा निधी व स्मृतीचिन्ह स्वरूपात राहील.

ब. राष्ट्रीय पुरस्कार रू.५१,०००/- (रूपये एक्कावन हजार) एवढ्या निधीचा व स्मृतीचिन्ह स्वरूपात राहील.

क. उपरोक्त पुरस्कारासाठी दर्जेदार साहित्य निवडीस संधी देण्यासाठी योग्य स्तरावरील वर्तमान पत्रातुन प्रसिध्दी व उचीत व्यवस्थापनाची जबाबदारी समन्वय यांची राहील.

११.संशोधन केंद्राचे उद्दीष्ट पूर्तीसाठी सदस्य नोंदणीचे नियम पुढे नमुद आहेत.

८. मासिक/वार्षिक स्वरूपात सदस्य नोंदुण संशोधन केंद्राचा लाभ व्यापक स्वरूपात जनमानसात व्हावा यासाठी वाढीव सदस्य नोंदणीचे वार्षिक उद्दीष्ट पूर्तीची जबाबदारी समन्वयक यांची राहील.

२. दरवर्षी किमान २५ सदस्य संख्या वाढविणेची जबाबदारी समन्वयक यांची राहील.

१२.संशोधन केंद्राचे उद्दीष्टांशी सुसंगत कामासाठी वेळोवेळी करावयाच्या खर्चास मा.आयुक्तांनी मंजुरी अधीन राहुन व्यवस्थापन चालविणे आवश्यक राहील.

१३.संशोधन केंद्राची दैनंदिन कामकाजास आवश्यक कर्मचारी वर्ग मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार व्यवस्थापकीय संचालक यांचे व्यवस्थापनाखालील अस्थापनेवरील कार्यरत राहील. व समन्वयक यांचे पर्यवेक्षण, नियंत्रण राहील.

१४.संशोधन केंद्राच्या वापरासंबंधी.

१. संशोधन केंद्र सभागृहाचा वापर उद्दीष्टांशी सुसंगत व्हावा या दृष्टीने सभागृह व परिसर प्रतिदिन रू.१,०००/- शुल्क आकारून वैचारीक व्यासपीठ म्हणून संस्थांना वापरता येईल, राजकिय कार्यक्रमासाठी वापर अनुज्ञेय असणार नाही.

२. संशोधन केंद्रा संलग्न अतिथी कक्षास स्वतंत्रपणे रू.२००/- शुल्क आकारणी करून संशोधन केंद्र उद्दीष्टा सुसंगत कामासाठी वापरता येईल.

३. अतिथी कक्ष वापराचे निकष व्यवस्थापकीय संचालक, समन्वयक व सल्लागार समिती निश्चित करील व त्यास महापालिका आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

१५. संशोधन केंद्र वाचनालयासाठी सदस्य नोंदणी व सभासदांसाठी नियम पुढे नमुद केल्याप्रमाणे राहतील.

१. सभासद शुल्कासाठी वार्षिक शुल्क रू.२००/- आणि नोंदणी शुल्क रू.५०/- इतके राहील.

२. सभासदांसाठी एका वेळेस एक पुस्तक मिळु शकेल.

३. सभासदास दरवर्षी सभासदत्व शुल्क भरून सभासदत्व नुतणीकरण करणे आवश्यक राहील.

४. सभासदांनी पुस्तक वापराचे व पुस्तक परत करण्याचे नियम तसेच मुदतीत पुस्तक परत करण्यासंबंधीचे नियम महानगरपालिका वाचनालयाप्रमाणे राहतील.

१६. संशोधन केंद्राचे उद्दीष्ट पूर्तीसाठी महानगरपालिकेकडून वेळोवेळी केलेल्या नियमावली अधीन संशोधन केंद्राचे व्यवस्थापन कार्यरत राहील.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.नरवडे वसंत : या प्रस्तावामध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नवभारत निर्माण कार्याचे वैचारीक व्यासपीठ म्हणून संशोधन केंद्र कार्यरत करणे. यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर ज्याप्रमाणे करण्यांत आले त्यानुसार करावे व हा प्रस्ताव मंजूर करून पुढील कार्यवाही व्हावी.

श्री.जोशी संजय : मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र जेथे तयार झाले, तेथील जागेची निवड करण्यासाठी श्री.अब्दुल रशिद खॉन (मामु) महापौर असतांना समिती गठीत करण्यात आली, त्या समितीमध्ये मी सूध्दा होतो. अतिशय चांगले व सुंदर ठिकाण आहे. प्रस्ताव ठेवला तो विचित्र पध्दतीने ठेवलेला आहे. या प्रस्तावावर जास्त चर्चा करणे योग्य नाही. त्यामुळे वाद होऊ शकतात. जे जे मुद्दे दिले ते अत्यंत चुकीचे आहेत. पुणे महापालिकेने कोरेगांव भिमाला अतिशय सुंदर मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर केलेले आहे. त्याची माहिती घ्यावी, अधिकारी नेमावे. कमिटी नियुक्त करावी. १,००,०००/- रूपये आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी ठेवणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील लोकांना पुरस्कार देणार आहात का? यात बदल करून महाराष्ट्र पातळीवर हे पुरस्कार ठेवावे. समिती स्थापन करावी. सर्व ज्येष्ट सदस्य व महापौर तसेच प्रशासनाचे अधिकारी त्या समितीत असावे व योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.मुजीब खॉन : डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर ज्याप्रमाणे नियम आहेत त्याप्रमाणे याही रिचर्स सेंटरला आहेत का? खुलासा घेण्यात यावा. दोन्हीसाठी एकच नियम असतील तर मान्यता घेण्यास हरकत नसावी.

श्री.कराड भागवत : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र महापालिकेने केलेले आहे. त्याच धर्तीवर मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र आहे. ज्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात विद्यापीठ मार्गदर्शनानुसार काही विद्यार्थी संशोधन करतात त्याप्रमाणे या संशोधन केंद्रात करता येईल का. विचार करावा,नुसती स्कॉलरशीप न देता मौलाना अबुल कलाम आझाद यांचे बाबतीत काही ग्रंथ

लिहीता येतील का? त्यांचे व्यक्तीमतावर लायब्ररी ओपन करता येईल का? हा प्रस्ताव जशाच तसा मंजूर न करता एक कमिटी नियुक्त करावी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र आहे, त्याच धर्तीवर कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांची संलग्नता घ्यावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक : प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरसाठी ज्या अटी शर्ती आहे, त्या धर्तीवरच हे करावे.

श्री.कराड भागवत : त्या धर्तीवर करता येणार नाही. या प्रस्तावात इतर बऱ्याच काही ॲडीशनल बाबी आहेत. एक कमिटी नियुक्त करावी. दोन-तीन नगरसेवक असावे. काही अधिकारी असावे, महापौरांचा समावेश असेल, विचार करून प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.अ.रशिद खॉन मामु : जसे यापुर्वी शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय झाले, तेथे ५०००/- दरमहा मानधनावर एका व्यक्तीची नियुक्ती केलेली होती. त्यास कोणी विरोध केला नाही. कारण तेथे जिजामाताचे मंदीर केले. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर झाले. महाराष्ट्रापेक्षा दिल्ली भागात उर्दू भाषेला जास्त ओळखतात. इंडिया व इंडियाच्या बाहेरचे मुले या शहरात पी.एच.डी. करीत आहे. या संशोधन केंद्रात पी.एच.डी. करणारे विद्यार्थी मिळतील. अबुल कलाम आझाद जेलमध्ये होते, त्यांनील उर्दू भाषेत पत्र लिहीले होते. उर्दू पेपर काढत होते. आता अनेक उर्दू मध्ये पेपर निघतात. त्याचा अभ्यास विद्यार्थी करतील. ते हे अबुल कलाम आझाद आहे. त्यांना ब्रिटीशने बोलले होते. तुम्हाला मोठी पोस्ट देऊ परंतू त्यांनी जामा मस्जिदमध्ये जाऊन म्हटले होते की, मी एक हिंदुस्थानी आहे. तुमच्या पोस्टची मला गरज नाही. यात थोडेफार बदल करू शकतो. पुण्याला जाऊन प्रत्यक्ष पाहणी करू शकतो. परंतू सर्व पदाधिकारी ज्येष्ठ सदस्य एकत्रित बसून जास्त चर्चा न करता निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर : एक समिती स्थापन करून पुणे येथे जाऊन तेथील मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राची माहिती घेवून पूढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या धर्तीवर करावे. कमिटी करणे याचा अर्थ कार्यवाही लांबणीवर टाकणे होय.

श्री.नरवडे वसंत : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली कमिटी आहे. त्या कमिटीत काही नविन सदस्याचा समावेश करून याबाबतीत निर्णय घ्यावा.

सौ.दलाल लता : पदाच्या संदर्भात जे दाखविण्यात आले. १० वर्षाचा अनुभव वगैरे परंतू हे करीत असतांना प्रोफेसर कॅटेगीरीचा त्यांना त्या विषयाचे ज्ञान असेल. अशा दोन चार दुरूस्त्या या ठरावात करणे आवश्यक आहे. त्या दूरूस्तीसाठी जे अनुभवी सदस्य आहेत, त्यांचा कमिटीत समावेश करून घ्यावा.

श्री.पांडे विनायक : कला शाखेची पदवी व पी.एच.डी.धारक यांना प्राधान्य राहील,अशी शैक्षणिक अर्हता यात दाखविण्यात आलेली आहे. हा ठराव पास करण्या अगोदर इतिहास तज्ञाचे मत नोंदवावे. त्या समितीमध्ये इतिहास तज्ञ यांचाही समावेश असावा. पुढील बैठकीत सुधारीत करून हा प्रस्ताव सादर करावा.

श्री.सलीम खॉन : प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर : यासाठी एक समिती स्थापन करून पुण्याला त्या कमिटीने भेट देऊन तेथील पाहणी करावी. पुढील सर्वसाधारण सभेत सर्व माहिती घेऊन पुन्हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी एक समिती स्थापन करून पुण्याला त्या कमिटीने भेट देऊन तेथील पाहणी करावी व पुढील सर्वसाधारण सभेत सर्व माहितीसह सदरील प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

पुरवणी विषय

विषय क्र. २३/१ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मजनुहिल येथील मुकबधीर शाळेपासून दिल्लीगेट पर्यंत रस्ता मंजूर झालेला असून भु-संपादन करून रस्त्याचे काम देखिल करण्यात आले आहे. परंतु नुरूल -हुदा दर्गापासून दिल्लीगेट पर्यन्तची मालमत्ता संपादीत न केल्यामुळे रस्ता अर्धवट स्वरूपात आहे. या रस्त्यामध्ये दर्गा नुरूल हुदा समोरील जागा आणि जि.प. औरंगाबाद यांची जागा संपादन केल्यास दिल्लीगेट पर्यन्तचा रस्ता मोकळा होईल.तसेच वाहतुकीच्या दृष्टीने देखील सोयीचा होईल. तरी दर्गाह नुरूल हुदा आणि जि.प. च्या जागा संपादीत करण्यासाठी रस्त्याच्या कामासाठी मंजूरी आणि योग्य ती तरतूद करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर

सुचक :श्री.मो.जावेद कुरैशी अनुमोदक:श्री.खान मुजीब मीर आलम खान

संवाद :

श्री.मुजीब खान : १९८८ कार्यवाही झालेली आहे. जिल्हा परीषदेचे दोन गोदाम व ऑफिस बांधून दिले. महापालिकेने आतापर्यंत भूसंपादन केले नाही. ती कार्यवाही करून रस्ता ताबडतोब करण्यात यावा. दोन वेळेस ठराव मंजूरीसाठी येतो.

श्री.कोकाटे काशिनाथ : विषय क्र.१ च्या संदर्भात सदर रस्ता करणे आवश्यक आहे. त्या रस्त्यावरून नविन शहरातील सर्व रहदारी आहे. सिडकोतून शहराकडे येणाऱ्या रस्त्याला जोडणारा रस्ता आहे. त्यासाठी हा रस्ता होणे अत्यावश्यक आहे. हा प्रस्ताव यापूर्वी देखील झाला, परंतू प्रशासनाने कार्यवाही न केल्यामूळे पुन्हा सादर झाला. हा रस्ता ठराविक कालावधीमध्ये व्हावा, तशी तरतूद बजेटमध्ये प्रशासनामार्फत करण्यात यावी. तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्या.

मा.महापौर : विषय क्र.१ मंजूर करण्यात येत असून प्रशासनाने संपादनाची कार्यवाही लवकर करावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहील येथील मुकबधीर शाळेपासून दिल्लीगेट पर्यंत पूर्ण रस्ता तयार करणेसाठी नुरूल हुदा दर्गाह पासून दिल्लीगेट पर्यंत रस्त्यासाठी नुरूल हुदा समोरील जागा आणि जिल्हा परिषद औरंगाबाद यांची जागा संपादन करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २४/२ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.८८ मधील निरंजन हौ.सो., शिवराज कॉलनी व दिपनगर येथील सभागृह तसेच राजनगर येथील मनपा शाळा व शाळेचे मैदान लग्नकार्य व इतर धार्मिक कार्याकरीता यापुढे भाडे तत्वावर देण्यात येऊ नये. कारण यापूर्वी सदर कारणासाठी ह्या मालमत्ता भाडे तत्वावर दिल्या असता, त्या ठिकाणी नागरीकांनी पत्रावळी/खरकटे ई. तसेच ठेवल्यामूळे नागरीकांना त्याचा त्रास झाला आहे व मालमत्तेचे देखील नुकसान होत आहे.

करीता उपरोक्त मालमत्ता लग्न व इतर तत्सम कार्यासाठी भाडे तत्वावर देवू नये, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जोशी, श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : श्री.संजय केनेकर, श्री.नारायण कुचे, श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.पुनमचंद बमणे

संवाद :

श्री.बारवाल गजानन : विषय क्र.२ व ३ सारखेच विषय आहे. महापालिकेने अनेक वास्तु तयार केल्या त्याचा लाभ नागरीकच घेत असतात. असा ठराव पास केल्यास मोठा अन्याय शहरातील नागरीकांवर होणार आहे. प्रशासनाचे अधिकारी यांनी दाखवून द्यावे की, कुठे व केंव्हा मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. कार्यक्रम होत असतांना नागरीकांना थोडासा त्रास होत असेल. परंतू मालमत्तेचे नुकसान झालेले नाही. असे प्रस्ताव मंजूर करून नये. विषय क्र.३ मध्ये महावीर हॉलचा उल्लेख केला ती जागा आमच्या परिवाराने दिलेली आहे. त्या ठिकाणी सद्य: परिस्थितीत बॅड मिंटन हॉल जरी असेल तेच राहणार आहे. परंतू लग्न कार्यासाठी व इतर कार्यासाठी देऊ नये, असा ठराव मंजूर करणे योग्य नाही.

श्री.गायकवाड दिलीप : स.स.श्री.बारवाल यांनी सूचना मांडली त्यास माझा पाठींबा आहे. गोरगरीब लोक या शहरात राहतात,त्यांचेसाठी असा ठराव पास करणे अन्यायकारक होईल.

श्री.जोशी संजय : वार्ड क्र.८८ करीता हा प्रस्ताव आहे. जे सभागृह बांधलेले आहे ते सांस्कृतिक सभागृह असून मंगल कार्यालय म्हणून बांधलेले नाही. महानगरपालिकेने मंगल कार्यालय, शादीखाने बांधलेले आहे तेथे लग्न कार्य करण्याची परवानगी आहे. सांस्कृतिक सभागृह व महापालिकेच्या शाळेत लग्न कार्यासाठी भाडेने देणे कितपत योग्य आहे. प्रशासनाची मान्यता असेल तर माझे दूमत नाही. प्रशासनाचा खुलासा करावा. स्थानिक रहीवासी यांना त्रास होतो रात्री १२.०० वाजेपर्यंत स्पीकर चालू असतात. या शेजारी लोक राहतात. जेवण झाल्यानंतर पत्रावळी तशाच राहतात. राजनगर मधील शाळेची इमारत भाडेने दिली होती, तेथे लाईट मीटर पासून लाईट पर्यंत सर्व वायर तुटलेले आहे. तेथील मुख्याध्यापक यांनी लेखी तक्रार दिलेली आहे. तेथे वॉचमनची व्यवस्था नाही. रू.५००/- प्रमाणे नाममात्र दराने देतो. मालमत्ता कर्मचारी कोणीही तेथे येऊन पाहणी करीत नाही. आता शाळा सुरू झालेल्या आहे. सांस्कृतिक सभागृह हे लग्न कार्यासाठी नसते. लग्न कार्यासाठी किमान प्रस्तावातील इमारती भाडेने देऊ नये. इतर कार्यासाठी दिल्यास हरकत नाही.

श्री.अ.रशिद खॉन मामु : शाळेची इमारत ही सुट्टीच्या कालावधीत भाडेने दिली जाते. शाळेच्या कालावधीत नाही. गरीब लोकांसाठी हॉल दिला जातो, शाळा नाही. आताच प्रस्ताव होता, बचत भवनचे जागेवर संत एकनाथ रंग मंदीर केले.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : जो निर्णय घ्याल तो संपूर्ण शहरासाठी लागू राहील असा निर्णय घेण्यात यावा.

श्री.कराड भागवत : महापालिकेच्या ८३ शाळा आहे. शाळेचा दर्जा काय असतो हे सर्व सदस्य, अधिकाऱ्यांना माहिती आहे. शाळेची इमारत ही शाळेसाठीच वापरात पाहीजे. शिक्षक बरोबर नसेल तर मुलांना शिकवीत नाही, तीच शाळा लग्न कार्यासाठी दिल्यास तेथे स्चच्छता होत नाही. माझ्या वार्डात शाळा आहे. लग्न कार्यक्रमासाठी दिल्यानंतर दोन दिवस शाळा सुरू होत नाही. जर लग्न कार्यासाठी शाळा देऊन दोन दिवस शाळा न भरविणे हे भावी पिढीच्या अधिकारावर गदा आणण्याचा आपणांस अधिकार नाही.

श्री.बारवाल गजानन : दिशाभूल होत आहे. सांस्कृतिक सभागृहाच्या बाबतीत चर्चा करतो आहे. भाडेची रक्कम कमी होत असेल तर वाढवून द्यावी.

श्री.दाभाडे हिम्मतराव : महापालिकेच्या शाळा ह्या गरीब वस्तीत आहे. लग्न विधीपार पाडण्यासाठी इतर ठिकाणच्या इमारती भाडेने घेणे फायद्याचे होत नाही. म्हणून या शाळेत गरीब

लोकांचेच लग्न कार्यक्रम होतात. त्यांना सवलत दिली गेली पाहीजे. महापालिकेस उत्पन्न मिळते. या शाळेत गरीब लोकच कार्यक्रम करतात. रविवार या दिवशी शाळा सवलतीच्या दराने दिली पाहीजे.

श्री.बारवाल गजानन : शाळेच्या समोरील जे मैदान वापरात दिले होते. त्यासाठी शाळेची एन.ओ.सी. घेतलेली आहे.

श्री.कराड भागवत : महापालिकेच्या शाळेत सुविधा देण्याबाबत परिस्थिती अत्यंत बिकट आहे. परत या सभागृहातील नगरसेवकांनी बाजू घेऊ नये.शिक्षणसमिती महापालिकेकडे आहे. त्यांचे मत घ्यावे. हजारो विद्यार्थी शाळेत शिक्षण घेतात. किमान शाळेच्या दिवशी तरी इमारत भाडेने देऊ नये. लग्न कार्यासाठी शाळेचे मैदान देण्यास हरकत नाही.

मा.महापौर : सभागृहाची भावना लक्षात घेता विषय क्र.२ व ३ च्या बाबतीत महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारती भाड्याने देऊ नये मैदानासाठी ५०० रूपये असेल ते वाढवून १०००/- रूपये करण्यांत यावे. इमारत भाड्याने न देता समोरील मैदान भाड्याने द्यावे. व ज्यांनी ते कार्यासाठी घेतले, त्यांनी तेथील साफसफाई करून द्यावी. जोपर्यंत साफसफाई करून देत नाही, तोपर्यंत अनामत रक्कम परत करू नये. त्यासाठी अनामत रक्कम ठेवण्यांत यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावात नमूद केलेल्या महानगरपालिकेच्या विविध इमारती भाड्याने न देता समोरील मैदान भाड्याने द्यावे. भाड्याचे दर दुप्पट करण्यात येते, त्यासाठी अनामत रक्कम घेण्यात यावी. व ज्यांनी ते कार्यासाठी घेतले, त्यांनी तेथील साफसफाई करून देणे आवश्यक आहे त्याशिवाय, अनामत रक्कम परत करू नये ई. दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २५/३ :

बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेची शाळा तसेच गांधीनगर येथील भगवान महावीर सांस्कृतिक सभागृह (बॅडमिंटन हॉल) सध्या लग्नकार्यासाठी देण्यात येतो, त्यामुळे बॅडमिंटन हॉलची मॅट खराब होते. तसेच शाळा लग्नकार्यासाठी दिल्यामुळे तेथे स्वच्छता राहत नाही, तसेच वसाहतीतील नागरिकांना ही त्यांचा त्रास होतो. करिता बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेची शाळा तसेच गांधीनगर येथील बॅडमिंटन हॉल लग्नकार्यासाठी भाड्याने देण्यात येऊ नये. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.अल्पा जैन अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेची शाळा तसेच गांधीनगर येथील भगवान महावीर सांस्कृतिक सभागृह (बॅडमिंटन हॉल) भाड्याने न देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २६/४ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बीड बायपास टी-पॉईंट (चक्रधर स्वामी चौक) ते नक्षत्रवाडी गावापर्यंत रस्त्यास कै.महंत आचार्य १०८ प्रवर नागराज बाबा यांचे नांव देण्यात यावे. त्यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले असून त्यांचे स्मृतिप्रित्यर्थ महानुभाव आश्रमासमोरून जाणाऱ्या रस्त्यास त्यांचे नांव देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : ०१. सौ.अनिता नंदकुमार घोडेले, ०२.श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : ०१. श्री.प्रल्हाद निमगांवकर, ०२. श्री.अनिल जैस्वाल

संवाद :

श्री.अ.रशिद खॉन मामु : विषय क्र.४ च्या संदर्भात सदर रस्त्यास यापूर्वीचे नांव देण्यात आलेले आहेत तसेच विषय क्र.५ मध्ये नमूद केलेल्या रस्त्यास कै.बाबुलाल पराती यांचे नांव यापूर्वीच दिलेले आहे.

मा.महापौर : नामांतर कमिटी करायची आहे. कमिटीकडे पाठवता येईल.

श्री.कराड भागवत : नामांतर कमिटीकडे पाठवू नये. कमिटीकडे पाठवणे म्हणजे काम न होणे. महंत नागराज बाबा हे देशातले मोठे संत होते या रस्त्यास त्यांचे नांव देण्यात यावे. विषय क्र.५ सुध्दा मंजूर करण्यांत यावा.

श्री.शिरसाट संजय : मागील बैठकीत बेगमपुराचे नांव बदलण्याचा प्रस्ताव होता तो ही मंजूर करून विषय क्र.४,५ हे दोन्ही प्रस्ताव मंजूर करावे.

मा.महापौर : मंजूर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बीड बायपास टी-पॉईंट (चक्रधर स्वामी चौक) ते नक्षत्रवाडी गावापर्यंत रस्त्यास कै.महंत आचार्य १०८ प्रवर नागराज बाबा यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २७/५ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै.बजरंगलालजी शर्मा यांचे दिनांक १३ मे २००५ रोजी दु:खद निधन झाले असून ते माजी नगराध्यक्ष होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांची आठवण म्हणून संस्थान गणपती राजाबाजार ते जाधवमंडी-मोंढा पर्यंतच्या मार्गास 'कै.बजरंगलाल शर्मा मार्ग ' असे नांव देण्यात यावे, तसेच लवकरच मार्ग नामकरण सोहळ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : ०१. सौ.अनिता नंदकुमार घोडेले, ०२. श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : ०१. सौ.वीणा सिध्द, ०२. श्री.किशोर तुलशीबागवाले, ०३.श्री.प्रल्हाद निमगांवकर

संवाद :

श्री.तुलशीबागवाले किशोर : माझ्या वार्डात ४ माजी नगराध्यक्ष होते, त्यापैकी एक हयात आहे. तीन नाही. या रस्त्यास बाबुराव पराती यांचे नांव दिलेले असून राजाबाजार ते शहागंज या रस्त्यास कै.बजरंगलाल शर्मा मार्ग असे नांव देण्याबाबत दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खॉन मामु : प्रस्ताव मंजूर करण्यास विरोध नाही. परंतु अगोदर नांव देण्यात आले तेथे बोर्ड लावण्यात आलेले आहे. एकाच रस्त्यास दोन नांवे देणे बरोबर नाही.

श्री.शिरसाट संजय : सूचना बरोबर आहे. या बाबतीत तपासणी करून घ्यावी, नांव देणे गरजेचे आहे.

मा.महापौर : मागील बैठकीत नांव देण्याबाबत प्रस्ताव होता गोगानाथ हे नांव देणे मंजूर करून विषय क्र.४ मंजूर करण्यांत येत असून विषय क्र.५ दुरूस्तीसह मंजूर करण्यांत येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राजाबाजार ते शहागंज या रस्त्यास कै.बजरंगलाल शर्मा मार्ग असे नांव देणे या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २८/६ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपाच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात महाराणा प्रताप यांचे तैलचित्र लावणेत यावे,कारण या सभागृहात सर्व मान्यवरांचे तैलचित्र लावलेले आहेत त्याचप्रमाणे महाराणा प्रताप यांचे तैलचित्र लावल्यास सभागृहाची शोभा वाढेल करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : ०१. श्री.कंवरसिंग बैनाडे, ०२. श्री.काशिनाथ कोकाटे, ०३. श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : ०१. श्री.नारायण कुचे, ०२. श्री.भगवान घडमोडे, ०३.श्री.गजानन बारवाल

संवाद :

श्री.अ.रशीद खॉन : हा प्रस्ताव मंजूर करावा अण्णाभाऊ साठे यांचे तैलचित्र लावण्यात यावे. रस्त्याचे नांव देणे व तैलचित्र लावण्याबाबत वेगळी बैठक आयोजीत करावी. यापासून शहराला काय फायदा?

श्री.कराड भागवत : प्रस्तावात जे नमुद केले, ते मंजूर करावे.

मा.महापौर : विषय क्र.६ मंजूर

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महापालिकेच्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात महाराणा प्रताप यांचे तैलचित्र लावणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९/७ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८० अंबिकानगर मुकूंदवाडी मधिल अंबिकानगर व त्याचे आसपासच्या वसाहतीत शासकीय दवाखाना उपलब्ध नसल्यामुळे या परिसरातील नागरीकांना अल्प किमंतीत वैद्यकीय सेवा उपलब्ध होवू शकत नाही करीता या परिसरातील नागरीकांसाठी अंबिकानगर मध्ये जागा भाडे तत्वावर घेवून त्या ठिकाणी आरोग्य सेवा केंद्र मनपातर्फे सुरू करण्यात यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : ०१. श्री.नारायण कुचे, ०२. श्री.दामोधर माधवराव शिंदे

अनुमोदक : ०१. श्री.भगवान घडमोडे, ०२.श्री.संजय जोशी, ०३. सौ.पुष्पाताई शिंदे

मा.महापौर : विषय क्र.७ मंजूर

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८० अंबिकानगर मुकूंदवाडी मधिल अंबिकानगर मध्ये जागा भाडे तत्वावर घेवून त्या ठिकाणी आरोग्य सेवा केंद्र महापालिकेतर्फे सुरू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०/८ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, राष्ट्रमाता जिजाऊ मॉ साहेब यांचा पुर्णाकृती पुतळा मुकूंदवाडी येथील बसस्टॉप समोर, सेंट्रल वर्कशॉपच्या जवळ जालना रोड, औरंगाबाद येथे बसविणे बाबत नागरीकांकडून सतत मागणी होत आहे. नागरीकांनी केलेली मागणी विचारात घेता सदरचा पुतळा उपरोक्त ठिकाणी बसविणे आवश्यक आहे.

करीता सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर. सदर पुतळा साठी लागणाऱ्या खर्चासाठी अर्थसंकल्पात १० लाखाची तरतूद ठेवण्यात यावी.

सुचक : श्री.बाबासाहेब पा.डांगे

अनुमोदक : श्री.बन्सीलाल गांगवे, श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.दामु अण्णा शिंदे

मा.महापौर : विषय क्र.८ मंजूर

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राष्ट्रमाता जिजाऊ मॉ साहेब यांचा पुर्णाकृती पुतळा मुकूंदवाडी येथील बसस्टॉप समोर, सेंट्रल वर्कशॉपच्या जवळ जालना रोड, औरंगाबाद येथे बसविणेस तसेच सदरील पुतळ्यासाठी लागणाऱ्या र.रू.१० लाखाची तरतूद आर्थिक संकल्पात ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३१/९ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, तत्कालीन प्रभारी आयुक्त श्री.भगत यांनी अधिकारी/कर्मचारी यांना दिलेले अतिरिक्त कार्यभार काढून घेण्याबाबत सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात आला होता. सदर निर्णयाची अंमलबजावणीसाठी त्यांनी हेतूपुरस्कर टाळाटाळ केल्याचे दिसते आहे. त्यामुळे या कालावधीत

त्यांनी केलेल्या सर्व कामांची शासनस्तरावर चौकशी व्हावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : ०१. श्री.संजय शिरसाट, ०२. श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : ०१. श्री.संजय जोशी, ०२. श्री.काशिनाथ कोकाटे, ०३. श्री.संजय जगताप

संवाद :

श्री.विसपुते शशांक : प्र.आयुक्त श्री.भगत साहेब यांचे कार्यकाळात किती वसुलीत वाढ झालेली खुलासा व्हावा.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा करावा, दोन महिन्यात किती वसूली झाली.

उपआयुक्त (प्र.) : प्र.आयुक्त म्हणून श्री.एम.एन.भगत हे दिनांक १८.०४.२००५ ते ३०.०५.२००५ पर्यंत महानगरपालिकेत कार्यरत होते. या कालावधीत महानगरपालिकेस पाणीपट्टी व मालमत्ता करामधून रू.२,२२,९३,३४४/- इतके उत्पन्न मिळाले आहे. जकाती पासून रू.१,५८,८९,०८७/- रूपये मिळाले हे दोन्ही फिगर मागील वर्षापेक्षा मिळालेल्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे.

श्री.गायकवाड कैलास : हा प्रस्ताव पुर्वग्रह दुषित भावनेतून ठेवलेला आहे. मंजूर करू नये.

श्री.केनेकर संजय : पुर्वग्रह दुषित भावनेतून हा प्रस्ताव नाही. मा.प्र.आयुक्त श्री.भगत साहेब यांनी स.सदस्य तसेच सभागृहाची दिशाभूल केलेली आहे, म्हणून प्रस्ताव ठेवला, मंजूर करावा.

श्री.बारवाल गजानन : प्रशासन व नगरसेवक हे बरोबर असावेत प्र.चार्ज दिल्यानंतर श्री.भगत साहेबाकडून कामाच्या अपेक्षा होत्या. अनेक प्रकरणे समोर आलेली आहे. ज्या ज्या प्रकरणांत कार्यवाही केलेल्या आहेत त्या दुषित भावनेतून केलेल्या आहे. जे अधिकारी/कर्मचारी अनेक वर्षापासून महापालिकेची सेवा करतात, त्यांचा गौरव सुध्दा केलेला आहे, असे असतांना सुध्दा त्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केलेली आहे. महसूल जेव्हढा मिळावयास पाहीजे तेव्हढा नाही विकासाची कामे काहीच नाही. हे दिसून येते. जी कार्यवाही करण्याचे ठरवले ते बरोबर आहे, हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.वैद्य रेणुकादास : कमी वेळ महानगरपालिकेत उपस्थित राहीले व त्यांना आवश्यक वाटल्या त्याच संचिका मागवून कार्यवाही झाली. विकास कामाकडे श्री.भगत साहेब यांनी दुर्लक्ष केले. त्यांचे कार्यकाळात वसूली सुध्दा कमी झालेली आहे. सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची पायमल्ली केलेली आहे. जो प्रस्ताव सादर केला, तो मंजूर करावा.

श्री.गायकवाड दिलीप : काही कर्मचारी/अधिकाऱ्यावर प्र.आयुक्त श्री.भगत साहेब यांनी कार्यवाही केल्यामूळे द्वेष भावनेतून हा प्रस्ताव सादर करून मंजूर करण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रस्ताव मंजूर करू नये. श्री.भगत साहेब हे चांगले अधिकारी आहेत. त्यांनी या महापालिकेस शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री.केनेकर संजय : महापालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. या सभागृहात लोकप्रतिनिधी असतात हा विसर प्र.आयुक्त यांना पडला होता. प्रस्ताव योग्य आहे. मंजूर करावा.

श्री.जगताप संजय : प्र.आयुक्त खरोखरच दोषी असतील तर कार्यवाही होईल. कोणत्या उद्देशाने अधिकाऱ्यावर कार्यवाही केली. मला असे वाटते की, जातीय भावनेतून श्री.महेंद्र खैरनार यांचेवर निलंबनाची कार्यवाही केली,म्हणून हा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठवावा.

श्री.पांडे विनायक : हा प्रस्ताव पुर्वग्रह दुषित नसून श्री.भगत साहेब यांनी कार्यवाही केली ती सभागृहाच्या विरूध्द होती. शासन स्तरावर त्यांची चौकशी झालीच पाहीजे प्रस्ताव मंजूर करावा.

सौ.दलाल लता : काही सदस्यांनी मत व्यक्त केले की, पुर्वग्रहदुषित भावनेतून हा ठराव काही सदस्यांनी मांडलेला आहे. या सभागृहात यापूर्वीही अनेक विशिष्ट जातीचे अधिकारी येऊन गेलेले आहे. परंतू या सभागृहात त्यांचा सत्कार केलेले आहे. गौरव केलेला आहे. कुठल्याही पुर्वग्रहदुषित भावनेतून हा ठराव ठेवलेला नाही. दूसरा मुद्दा असा की, मा.आयुक्तांनी पुर्वग्रहदुषित भावनेतून संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केलेली आहे. केलेली कार्यवाही मागे घ्यावी. ते ही या सभेचे सदस्य असतात. या सभागृहात जे निर्णय घेतले जातात, महापौर जे निर्णय घेतात,त्याची अंमलबजावणी मा.आयुक्तांनी करावयास पाहीजे. मा.आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयाचे पालन तर केलेच नाही. परंतू विलंब लावला, मा.महापौरांना सुध्दा वेगवेगळे उत्तरे दिली. त्यानंतर यावर मा.आयुक्तांनी विधी सल्लागार यांचा सल्ला मागविला, विधी सल्लागार यांनी सुध्दा असा अभिप्राय दिला होता की, जे निर्णय सर्वसाधारण सभेने घेतले तो आयुक्तांनी पाळला पाहीजे, परंतू तसे झाले नाही. सर्वसाधारण सभेचा अपमान आहे. त्यामूळे त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी व तसा ठराव शासनास पाठवावा. आय.ए.एस. अधिकारी यासाठी येथे पाठविले जातात की, वसूली असेल, जनतेची कामे असतील, या ठिकाणचे निवडून आलेले लोकप्रतिनिधी असतील, या ठिकाणची जी काही विकासात्मक कामे असतील, या ठिकाणचे उद्‌भवलेले पाणी प्रश्न असतील, या ठिकाणी उद्‌भवलेले ड्रेनेजचे,रोगराईचे प्रश्न असतील यासाठी निर्णय घेणारा एक सक्षम अधिकारी असावे म्हणून पाठविले जातात. परंतू दुर्दैव असे की, हे सर्व प्रश्न बाजूला ठेवून प्र.आयुक्त यांनी त्यांचे लक्ष केवळ कर्मचाऱ्यावर कार्यवाही करणे. नगरसेवकांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे आणि सातत्याने या महानगरपालिकेत अनुपस्थित राहणे एवढेच केलेले आहे. जेंव्हा या सर्वसाधारण सभेने त्यांची चूक त्यांचे लक्षात आणून दिली तरी त्यांनी माझी चूक झाली हे म्हणण्याचा सुध्दा त्यांनी तारतम्य दाखविले नाही. म्हणून या सर्वसाधारण सभेचा अपमान आयुक्तांनी केलेला आहे. त्यांचेवर शासनाने कार्यवाही केलीच पाहिजे असा ठराव या ठिकाणी मंजूर करण्यात यावा.

श्री.मोरे कचरू : महापालिकेचे काम आयुक्त यांचे शिवाय होत नसेल व सभागृह मा.आयुक्त यांचा सन्मान करीत नसेल तर त्याची गरज काय? प्रशासकीय दृष्टीकोनातून प्र.आयुक्त यांनी निर्णय घेतलेले होते. हा प्रस्ताव मंजूर करू नये. आकस भावनेतून हा ठराव होत आहे, असे वाटत नाही का?

मा.महापौर : विषय समजून घ्यावा श्री.भगत साहेब यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव नाही शासन स्तरावर चौकशी व्हावी, असा प्रस्ताव आहे. जे ते दोषी आढळले तर कार्यवाही होईल.

श्री.अजीज जहागिरदार : हा प्रस्ताव यासाठी आहे की, येणारे आयुक्त यांनी दडपणाखाली काम करावे, प्र.आयुक्त यांना जे अधिकार आहेत ते त्यांनी वापरले आहे. नियमाचे उल्लंघन करून कोणतेही काम त्यांनी केलेले नाही. हा ठराव पास करू नये. यांना हे दाखवायचे की, तुम्ही आम्ही म्हणाल तसे वागलात नाही तर तुमच्या विरूध्द सुध्दा कार्यवाही करू.

श्री.दाभाडे हिम्मतराव : जे ही आयुक्त येतात ते त्यांचे अधिकार वापरण्यासाठीच येत असतात. एखादा नगरसेवक किंवा सभागृहाच्या दबावाखाली अशी कार्यवाही होत असेल तर मुळीच सहन केले जाणार नाही.

श्री.कोकाटे काशिनाथ : विषय क्र.९ वर चर्चा होत आहे. मी सुध्दा अनुमोदक म्हणून सही केली आहे. गेल्या वीस वर्षापासून सामाजिक व इतर दृष्टीकोनातून या महानगरपालिकेत कार्यरत आहोत. कामकाज कसे करावे व कोणी कशा पध्दतीने कार्यवाही केली पाहीजे याची सर्व कल्पना मला आहे. सामाजिक जाणीव, या शहराचे वातावरण चांगले ठेवण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले व करणार आहोत. हा ठराव शासनाकडे पाठविण्यासाठी आहे, ठराविक कालावधीसाठी प्र.आयुक्त यांनी एक महिन्याच्या कालावधीत विकासात्मक काम किंवा मंजूरीसाठी गेलेल्या संचिका बाबत निर्णय घेण्या ऐवजी इतर कार्यवाही केली त्यांना अधिकार असतात मान्य आहे. पुर्वग्रह दुषित किंवा नविन आयुक्तासाठी हा प्रस्ताव ठेवला अशी भावना जी व्यक्त केली ती अत्यंत चूकीची आहे. जनतेने या सभागृहात पाठविले आहे. सभागृहाने एकमुखाने ठराव घेतला की, जी कार्यवाही केली ती मागे घेण्यात यावी. मा.महापौरांनी आदेशित केले होते. सभागृहाला विश्वासात घेऊन निर्णय दिला होता. एखादा ठराव सभागृह पास करीत असेल व त्याची अंमलबजावणी होत नसेल तर कुणाचीही दया करण्याचे कारण नाही. पुणे महानगरपालिकेने मा.आयुक्त यांच्या विरोधात ठराव पास केला होता. त्या परिस्थितीत आयुक्तांना परत जावे लागले. सभागृहाला अधिकार आहे. त्या अधिकाराला तडा जात असेल तर कोणाचीही बाजू घेऊ नये. कार्यवाही अपेक्षित आहे. या सभागृहात स्वाभिमानाने आपण आपले अधिकार वापर करू यापूर्वी अनेक आयुक्त येऊन गेले, त्यांना या महापालिकेचे अधिकारी उध्दटपणे वागतात. कुठेतरी चूकीचे बोलतात हे कळाले नाही का? कोणत्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करतांना चौकशी करून कार्यवाही होते. चौकशी अहवाल काय होता, तो शुन्य होता म्हणून याची चौकशी शासनाने करावी, हा ठराव मंजूर करावा.

श्री.गायकवाड दिलीप : आचार संहितेच्या काळात किती विकास कामाच्या संचिका मंजूर झाल्या, खुलासा करावा

श्री.दाभाडे हिम्मतराव : आतापर्यंतचा इतिहास आहे, जे जे आयुक्त येथे आले त्यांना या सभागृहाने काम करू दिले नाही, म्हणून हा प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.दाभाडे मिलींद : प्र.आयुक्त श्री.भगत यांनी ज्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली, ती मागे घेतलेली आहे. त्यामूळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच येत नाही, प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.घडमोडे भगवान : पुर्वग्रह दुषित हा प्रस्ताव ठेवला असे काही सदस्यांनी म्हटले आहे. परंतू असे म्हणने चुकीचे आहे. सर्वसाधारण सभेच्या अधिकारावर गदा आणली म्हणून हा प्रस्ताव ठेवलेला आहे. कूणाची बाजु घेण्या करीता ठराव नाही. सर्वसाधारण सभा सक्षम असते. जे निर्णय घेतात, ते निर्णय कुणी अंमलात आणित नसेल तर या सभागृहाचा अपमान आहे. पदाधिकाऱ्यांनी सह्या केल्या, काही नगरसेवकांना बोलायचे परंतू कामे होणार नाही म्हणून बोलत नाही. प्र.आयुक्त यांनी विकास कामात टाळाटाळ केलेली आहे. इतर कार्यवाहीच केलेली आहे. व हा प्रस्ताव शासनास पाठवून विनंती करावी की, असे अधिकारी महानगरपालिकेमध्ये पुन्हा पाठवू नये व या महापालिकेचे नांव बदनाम करू नये. अशी विनंती करावी.

श्री.भगवान घडमोडे : या प्रस्तावा बरोबरच शासनास अशी विनंती करावी की, असे अधिकारी पुन्हा महानगरपालिकेत पाठवू नये आमच्या महानगरपालिकेचे नाव खराब होत आहे.

आम्हाला या महानगरपालिकेचा विकास करावयाचा आहे. ही महापालिका आम्हाला स्वच्छ ठेवावयाची आहे.

मा.महापौर : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तत्कालीन प्रभारी आयुक्त श्री.भगत यांनी अधिकारी/कर्मचारी यांना दिलेले अतिरिक्त कार्यभार काढून घेण्याबाबत सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणीसाठी त्यांनी हेतूपुरस्कर टाळाटाळ केल्याचे दिसून आल्यामूळे, या कालावधीत त्यांनी केलेल्या सर्व कामांची शासनस्तरावर चौकशी करणेस तसेच त्यांना पुन्हा या महानगरपालिकेत पाठवू नये असे शासनास कळविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ''राष्ट्रगिताने'' सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.